
# झालं गेलं विसरून जाऊ

( दोन अंकी नाटक )

चं. प्र. देशपांडे.



# क्लॅरिटी

## अर्थात

## झालं गेलं विसरून जाऊ

## ( दोन अंकी नाटक )

**-- चं. प्र. देशपांडे.**

( एक नीटनेटके घर. समोर भिंतीवर एखादे अतिवास्तववादी चित्र. फोन, पुरेसे फर्निचर. हेमंत, सुमारे पंच्याहत्तरचा, फ्रेश, पुस्तक वाचत बसलेला. दारावरची बेल वाजते. हेमंत पुस्तक बाजूला ठेवतो. चेहऱ्यावर स्मित. उठतो. )

स्मिता : ( सुमारे सत्तरची -- आतूनच -- ) बघ बरं -- रोहिणीच असेल --

हेमंत : हो, बघतोय --

स्मिता : ( आतूनच -- ) आणि एक मिनिट ! -- तिला इकडे आत नको येऊ देऊस -- एकदम बघितल्यावर मजा वाटू दे तिला जरा --

हेमंत : बरं, नाही येऊ देत -- ( जाऊन दार उघडतो. रोहिणी येते. ) ये, ये, तुझीच वाट पाहतोय आम्ही -- अरे वा ! -- पण आमच्याकडे यायला एवढा नट्टापट्टा कशाला ?

रोहिणी : आणि तुम्ही का बसलाय मग असे विशेष कपडे घालून ?

हेमंत : अगं, वाढदिवस आहे तुझा मुली आज ! योगायोगानं मिळतेय ही संधी आम्हाला ! परम बाहेरगावी असल्यामुळं !

रोहिणी : बरं, काकू काय करतायत ? काकू ऽऽ ( आत जाऊ लागते -- )

हेमंत : ए, थांब थांब थांब, आत नको जाऊस ! तिनं बोलावल्यावरच जायचंय आत --

रोहिणी : का बरं ? बरं, ओके -- बसते इथंच --

हेमंत : मजेत साजरं करायचं ठरलंय ना -- होऊ दे ना मग तसं --

रोहिणी : तुमच्या विचारात बसतं ना पण हे ? -- साजरं करणं वगैरे ? -- नाहीतर उगीचच माझ्यासाठी कॉम्प्रमाईज !

हेमंत : तसं काही नाही अगं -- आमच्या मुलांचे करतच होतो की आम्ही वाढदिवस ! -- फक्त त्याचे जाहीर समारंभ आम्ही कधी केले नाहीत !

रोहिणी : पण, चार नातेवाईक असले, दोनतीन मित्र असले, एखादा शेजारी असला आणि एखादा समविचारी असला तर चाललं असेल अशा दिवशी !

हेमंत : म्हणजे तू काय --

रोहिणी : गंमत हो काका !

हेमंत : बरं, स्मिता बाहेर आल्यावर आम्ही एकत्रच तुला विश करू -- त्या वेळी, वाटलं तर तू आम्हाला नमस्कार  करू शकतेस --

रोहिणी : आणि मग तुम्ही आशीर्वाद द्याल ?!

हेमंत : अर्थात ! आपल्या पानांभोवती रांगोळ्याही घातल्या असतील तिनं ! तुझं एक सर्प्राईज कमी झालं ! तिला नको बोलूस हे !

रोहिणी : चालतं हे सगळं तुम्हाला ? मला माहीत नाही म्हणून विचारतेय --

हेमंत : आपल्या सवयी, आपलं कल्चर टाकून जगता यावं इतकं आमच्या विचारांना यश कुठं मिळालंय इथं ? आता तुझं नाव टाकलेला केकही आणला असेल तिनं म्हणजे आम्ही काय फ्री ट्रेडवाले झालो ? की खाजगी मालमत्तेच्या बाजूचे झालो ? जाऊं दे -- दुसरंही सर्प्राईज गेलं ! केकचं ! बोलू नकोस पण हे ! ... आता  मार्क्सिझमचा अभ्यास आम्ही इंग्रजीतून केला म्हणजे मनानं आम्ही भांडवलवाद मानतो असं थोडंच आहे ?! -- एक गोष्ट आम्ही कटाक्षानं पाळली -- अमेरिकन स्पेलिंग्स कधीही स्वीकारली नाहीत ! ( इथे स्मिता केक वगैरे घेऊन बाहेर येते. रोहिणी पुढे होऊन तिला मदत करते. )

रोहिणी : काय हे काकू ? --  केक ?! माझ्यासाठी एवढी तडजोड ?

स्मिता : अगं, केकचा द्वेष करायला आम्ही काही हिंदुत्ववादी नाही ! उलट संस्कृतिसंघर्ष टाळण्यातच मुख्य आर्थिक प्रश्न महत्त्वाचे ठरतील असं आम्हाला वाटतं !

हेमंत : पोषाख कुठं पारंपरिक आहे ? आपण वापरत असलेल्या हजारो गोष्टींचे शोध त्यांनीच लावलेले आहेत ! हे सगळं वगळून जगावं असं म्हणतच नाही आम्ही ! आर्थिक स्वरूपाचा वर्गविग्रह समोर यावा आणि तोच संघर्ष महत्त्वाचा ठरावा -- ठरेल असं आम्ही मानतो ! ‘ मानतो ‘ म्हणजे होणारच तसं !

स्मिता : आता हे समोरचं चित्र ! अतिवास्तववादी शैलीतलं आहे -- हे कसं काय इथं -- असं तू मला विचारलं होतंस --

रोहिणी : हो --

हेमंत : अरे वा, थांबा थांबा ! इंटरेस्टिंग ! काय उत्तर दिलं होतं हिनं ?

रोहिणी : '' मनाच्या तळातनं सगळं बाहेर काढणारी ही चित्रं असतात ! म्हटलं तर वेडीही ! पण आहे त्याचंच खोदकाम असतं हे ! उगीच काल्पनिक, अध्यात्मिक काही नाही ! ''

हेमंत : मस्त ! आणि आम्ही काही अगदीच रुक्ष, निर्बुध्द बुध्दिवादी नाही, हेही दिसून येतं यातनं ! कलेची कदर करतोच आम्ही ! असो ! ( सगळे मांडून झालेले आहे. ) हं, चलो !

रोहिणी : फारच केलंय बाबा तुम्ही ! ( बसते. केक कापते. हेमंत-स्मिता टाळ्या वाजवतात. )

हेमंत-स्मिता : हॅपी बर्थडे टू यू ! रोहिणी ! हॅपी बर्थडे टू यू ! ( एकमेकांना केक खाऊ घालतात. )

रोहिणी : फारच झालं बाबा हे --

स्मिता : अगं मी असा विचार करत होते की परम समज मुलगाच असता माझा तर मी तुला काय म्हटलं असतं ? सून ? की काय ? लग्न न करता एकत्र राहण्यात हा एक प्रोब्लेमच आहे बाई !

हेमंत : आधी हिचा तो कोण ते नाव तरी काढा शोधून ?! मित्र ? साथी ? -- हे अगदीच समाजवादी होतं ! ' भाई ' तर कॅन्सलच !

रोहिणी : नव्या नात्यांना एक तर नवे शब्द काढावे लागतील नाही तर आहे त्या शब्दांचे अर्थ तरी बदलावे लागतील -- आणि सूनबीन मला नाही आवडत -- मी काही कुठं हळदीकुंकवाला वगैरे जाणारी मुलगी नाही --

स्मिता : तर मला म्हणायचं होतं -- तसंच हे समज ! म्हणजे कसं ?

रोहिणी : बरं, जाऊं द्या ते सगळं काकू --

स्मिता : बरं, जाऊं दे --

हेमंत : हे अगदीच अमेरिकन झालं ! जणू आपल्याला गुंतागुंतीचा कुठलाही विचार नको आहे आणि आपण आयुष्य एंजॉय करणारे आहोत !

स्मिता : मग आदीला नेहमीप्रमाणे ठिपश्यांकडे ठेवलास का ? राहतो का नीट तिथे ?

रोहिणी : राहतो की ! याचं टूरिंग सारखंच चालणार मधनंमधनं -- आणि प्रत्येक वेळी मला रजा कशी मिळणार ? त्या फॅमिलीलाही पैश्यांची गरज आहे -- एरवीही दिवसभर असतोच तो त्यांच्याकडे -- अशा वेळी जरा जास्त -- इथून मी ऑफीसला जाणार आहे --

स्मिता : खरं आहे, इलाज तरी काय दुसरा ? आणि लहान मुलं होतात ॲडजस्ट !

रोहिणी : तो आता काही नाहीय प्रश्न --

स्मिता : चला, मस्त रांगोळ्या घातल्यायत -- आणि श्रीखंडाचा बेत आहे --

रोहिणी : रांगोळ्या ?

हेमंत : संस्कृतिसंघर्ष टाळलेच पाहिजेत ! अगदी क्रांती होऊन आपल्या विचारांची राजवट आली तरी ! आपला मुख्य लढा उत्पादनांच्या साधनांच्या बाबतीतला आहे ! खाजगी मालकी नसावी !

स्मिता : बरं, चला, आता आहे या परिस्थितीत काय करता येईल ते करू या -- हे सगळं आत नेऊ या, आणि मी आता पानं वाढायचं बघते --

रोहिणी : हं, चला नं -- ( केक, डिश वगैरे घेऊन दोघी आत जातात. )

स्मिता : ( आतच -- ) हं, रोहिणी, तू बाहेरच थांब जरा वेळ, सगळं मीच करणार आहे, मी बोलावलं की या --

रोहिणी : ( आतच -- ) अहो पण --

स्मिता : नो ! -- प्ली ऽ ज --

रोहिणी : बरं -- ( म्हणत बाहेर येते. ) काका, एक विचारू का ?

हेमंत : हो ऽ --

रोहिणी : मी आणि परम जसे लग्न न करता एकत्र राहतोय -- एकमेकांच्या संमतीनं आम्ही मूलही होऊ दिलंय -- तसं समजा तुमच्याच कुठल्या मुलानं केलं असतं तर ?

हेमंत : काहीच प्रॉब्लेम आला नसता ! आणि यात काही सेन्सेशन निर्माण होणं आपल्या नशिबात नाही हे ओळखूनच बहुधा दोघांनीही रीतसर लग्नं केली असावीत !

रोहिणी : काका, ' नशीब ' ? हा शब्द चालतो तुम्हाला ?

हेमंत : अगं, भाषा आहे ही ! भाषा काही एखादी विचारसरणी लक्षात घेऊन तयार होत नाही ! आणि या देशात इतकी गरिबी असूनही आपल्या फायद्याचं काय हे बहुसंख्यांना न कळणं हे नशीबच नाही तर काय ! एक पगारवाढीचे करार सोडले तर महत्त्वाचे विषय काय, तर -- विचारस्वातंत्र्य आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य ! कुणाला गरज असते यांची ? मुख्य काय ?

रोहिणी : पण अभिव्यक्तिस्वातंत्र्य लागेलच हं काका ! नाही तर मग तुम्हाला कलेची कदर कशी करता येईल ?

हेमंत : उडवलीस टोपी माझी ?

रोहिणी : टोपी उडवण्यासाठी नाही हो काका, तुमच्या बोलण्यात ही विसंगती येतेय, तर ती बाहेर कुठे दिसू देऊ नका -- असं जागं करतेय मी तुम्हाला --

हेमंत : ओके ! थँक्यू ! बरं, असो ! ठीक चाललंय ना एकूण तुमचं ?!

रोहिणी : ( जणू खरे बोलणे टाळत -- ) हं, ठीक आहे ! -- ( तेवढ्यात फोनची रिंग वाजते म्हणून हेमंत तिकडे जातो. रोहिणी आत जाते. )

हेमंत : ( फोनवर -- ) कोण ? भास्कर ? अरे वा ! जिवंत आहोत म्हणजे आपण ! व्हेरी गुड !

भास्कर : ( फोनवर -- ) मधे तुझा एक लेख दिसला -- त्याच्या खाली तुझे फोननंबर्स होते --

हेमंत : छानच झालं ते -- कधीतरी लिहिण्याचा हा एक चांगला उपयोग म्हणायचा ! -- पण --

भास्कर : लेख वाचून मत कळवावं एवढा उत्साह नाही रे राहिलेला -- शिवाय मतभेद ! -- भेटल्यावर बोलूच --

हेमंत : अरे, हा कसला सूर लावतोयस ?

भास्कर : बरं, तुम्ही कसे आहात ? तब्येती वगैरे ?

हेमंत : उत्तम !

भास्कर : अरे, मी आलोय इथंच -- माझा जरा मुक्काम असणार आहे इथं चारपाच दिवस -- मधेच कधीतरी येऊन जाईन -- येण्याआधी फोन करीन --

हेमंत : वेलकम एनी टाईम ! तू ठीक आहेस ना ?

भास्कर : हं, ठीक आहे -- बाकी भेटीअंती --

हेमंत : बरं, ठीक ! स्मिताला बोलावू ?

भास्कर : नको, राहू दे -- भेटीअंती बोलूच --

हेमंत : गडबडीत आहेस काय ?

भास्कर : हं, तसंच जरा -- ठेवू का ?

हेमंत : अच्छा, ठीक ! छान वाटलं ! ये पण ! चांगलं वेळ काढून ये !

भास्कर : हो, हो -- अच्छा !

हेमंत : आनंद वाटला ! तुझ्या फोनचा शब्दाशब्दाचा रिपोर्ट देतो स्मिताला --

भास्कर : हो हो, दे ! -- ( रोहिणी येते. )

रोहिणी : वाढलीयत पानं --

हेमंत : हो आलोच -- अगं, एके काळचा जिगरी दोस्त हा आमचा -- ( असे म्हणत रोहिणीमागोमाग आत जातो. इथे हे दृश्य संपते. अंधार. संगीत. पुढील दृश्य. दुसरा दिवस. बेल वाजते. स्मिता येते. फ्रेश आणि नीटस. दार उघडते. भास्कर आत येतो. हा सुमारे पंच्याहत्तरचा. )

स्मिता : ये, बस; हे असं असं होणार असं वाटलंच होतं मला !

भास्कर: (बसत--) ' असं असं ' म्हणजे ?

स्मिता : हेच की तू संध्याकाळी सुमारे पाच वाजता येणार असं ! त्याआधी साडेचारला तुझा फोन येणार असंही !

भास्कर : पण काल फोन केला तेव्हा -- दिवस नव्हता ठरलेला ! --

स्मिता : तेही आजच -- हेही वाटलं होतं ! साडेचारला तू फोन करणार की आजच येतोय म्हणून -- घर आणि मी यांना नीटनेटकं व्हायला तू अर्धा तास देणार आणि मग पाच वाजता दारावरची बेल वाजणार !

भास्कर : पण मी तर म्हणालो होतो की चारपाच दिवस माझा इकडे मुक्काम असणार आहे, त्यात कधीतरी येऊन जाईन !

स्मिता : भास्कर, तू जर आजच येणार आहेस हे सांगितलं असतंस तर हेमंत थांबला असता घरी !

भास्कर : अच्छा, म्हणजे त्यानं थांबू नये म्हणून ! बरं, पण मग साडेचारलाच का फोन ?

स्मिता : सरळ आहे ! एकूण आमच्या तब्येती कशा आहेत हे तू जाता जाता विचारलं होतंस आणि चांगल्या आहेत हे तुला कळलं होतं !

भास्कर : बरं, मग ?

स्मिता : तब्येती चांगल्या आहेत याचा अर्थच हेमंत घरातून चारला बाहेर पडणार आणि पत्ते खेळून संध्याकाळी साडेसातला परत येणार हे निश्चित होतं ! गेल्या कित्येक वर्षांचा परिपाठच आहे तो त्याचा !

भास्कर : आयला, कमाल आहे हं स्मिता । वयामुळं तुझ्या मेंदूचा तल्लखपणा कणभरही कमी झालेला नाही !

स्मिता : माझ्याशी एकटीशी थोडा वेळ तरी बोलता येणं गरजेचंच आहे तुला !

भास्कर : आता नाही कशाला म्हणू, खरंच आहे ते ! पण हे सगळं बोलण्यापेक्षा नुसतं समजून राहता आलं असतं तुला !

स्मिता : अशा काही गोष्टी बोलण्यातच मजा असते !

भास्कर : याही वयात ?

स्मिता : मेंदू चालतोय, मनात काही घडतंय -- कळतंय तोपर्यंत !

भास्कर : बरं ठीक आहे, बरीच वर्षं भेट झाली नसली तरी मधला काळ सगळा वितळून गेला ! आणि तुझ्यामाझ्यात लपवाछपवी कसली ? मोकळंच झालं सगळं वातावरण !

स्मिता : आवश्यकच होतं ना असं होणं !

भास्कर : बरं, स्मिता, हेमंत इतकी वर्षं पत्ते खेळतोय, काय सारांश काय आहे -- जिंकतोय की घालवतोय पैसे ?

स्मिता : एकूणात जिंकतोयच ! फार फायदा नाही पण तोटा मुळीच नाही !

भास्कर : डाव्या विचारसरणीत बसतं हे ? खाजगी मालमत्तेलाच नाकारायचं म्हटल्यावर ? बिनश्रमांच्या पैशाची हाव ?

स्मिता : या प्रश्नावर पूर्वीही खूप चर्चा झालेली आहे ! ते जाऊं दे ! तुझी काय हालहवाल ?

भास्कर : आमचा घटस्फोट झाल्याचं मी कळवलं होतंच !

स्मिता : तुझ्या एकसष्टीनंतर झाला !

भास्कर : हो, मेधा तशी समजूतदार होती -- मुलांची लग्नं झाल्यावर घेऊ म्हणाली घटस्फोट ! त्यांचं स्मूथ सगळं व्हावं म्हणून हा तिचाच शहाणपणा ! मलाही पटणारा ! अर्थातच ! काय फरक पडणार होता ! आम्हाला एकमेकांपासून सुटायचं होतं ! ते ताबडतोब व्हायला हवं असं काही नव्हतं !

स्मिता : हं ! आणि मुलं ?

भास्कर : मुलं तिच्या बाजूचीच होती ! राकेश आणि माधुरी ! काही गरज पडली तर कळवा म्हणाली ! झालं !

गेल्या काही वर्षांत भेट, फोन काही नाही !

स्मिता : इतका तिटकारा निर्माण करू शकलास तू !

भास्कर : त्यासाठी मी कोणतेही प्रयत्न केले नाहीत !

स्मिता : (काही क्षणांनी -- ) आता हे सगळं तुझ्या आयुष्यात कसंकसं घडत गेलं हे बोलण्यात, मला वाटतं, वेळ नको घालवायला ! तू कसा निरपराध आहेस हे समजून घ्यायची मला गरज नाही । मी ते गृहीत धरायला तयार आहे !

भास्कर : नाहीतरी कुणाची बाजू घ्यायची हे आधीच ठरलेलंच असतं !

स्मिता : म्हणूनच !

भास्कर : ( काही क्षणांनी -- ) तुला जुगाराची एक गंमत सांगतो ! आमच्या बँकेतला एक युनियन पुढारी आणि दुसऱ्या बँकेतला एक युनियन पुढारी ! दोघंही अर्थातच डाव्या विचारसरणीचे ! पण दोघांनाही रेस, दारू आणि सिगरेट -- ही व्यसनं ! माहीत असलेली ! दोघंही आपापल्या बँकेत टेरर होते ! आमच्या बँकेतला पुढारी तर कर्मचाऱ्यांच्या बदल्या वगैरे हव्या तशा करून देण्यासाठी त्यांच्याकडून लाच घ्यायचा ! तेही पैसे पुरले नाहीत म्हणून नंतर त्यानं फ्रॉडही केला ! त्या दुसऱ्यानं हाऊसिंग लोनसह अनेक कर्जांचे गैरवापर केले ! कॅशशॉर्टेजमध्येही सापडला ! शेवटी दोघंही वेगवेगळ्या वेळी डिसमिस झाले ! अशी संधी मॅनेजमेंट का सोडेल ! ?

स्मिता : याचा अर्थ काय ? डावी विचारसरणी म्हणजे, क्रांतीची शक्यता आली तर आपण तिकडे पाठिंबा देऊ पण तसं काही घडत नसेल तर आहे तसे वागू ! खाजगी मालमत्ता नसावी -- किंवा उत्पादनाची साधनं खाजगी नसावीत असं आपल्याला पटत असलं तरी उपयोग काय ? आहे या परिस्थितीत काय करायचं ? हेमंतचं पार्टनरशिपमध्ये युनिट होतं -- परदेशातही ते बॉयलर दुरुस्तीची वगैरे कंत्राटं घ्यायचे -- त्यातही बऱ्यापैकी पैसे मिळायचे ! झालीच मालमत्ता ! पक्षकार्यालाही तो मधनं मधनं देणग्या द्यायचा !

भास्कर : बरेच असतील आपल्यासारखे ! हे एक व्द्वंव्दच राहिलं आपल्या आयुष्यात ! विचारसरणी आणि वागणं ! ही एक वेगळीच व्द्वंव्दात्मक भौतिकता म्हणायची !

स्मिता : अशी स्वत:ची चेष्टाही करावी कधीकधी !

भास्कर : आपली इच्छा होती, पाठिंबाही होता पण घडलं नाही तसं काही ! जागतिक स्तरावरही पीछेहाटच झाली ! तरीही विचारसरणी सोडलेली नाही आपण !

स्मिता : आपापल्या विचारसरण्या घेऊनच जातात सगळे विद्युतदाहिनीत !

भास्कर : म्हणून काय जिवंत असतानाही विचारसरणी निरर्थक असते ? जिवंत असताना एकूणच माणसाचं आयुष्य सुधारावं असं वाटू नये ?

स्मिता : तरी किती झाली असेल मालमत्ता ?

भास्कर : बँकेच्या कृपेनं हौसिंग लोन घेऊन, प्लॉट घेऊन बऱ्याच वर्षांपूर्वी बंगला बांधला होता आणि जमेल तसतसं मजला वाढवणं वगैरेही केलं होतं -- त्याचीच किंमत आज सुमारे पन्नास लाखांपर्यंत आहे ! शिवाय इतर काही शेअर्स, डिपॉझिटस् वगैरे मिळून सत्तरपर्यंत धरून चाल ! काही शेअर्सनीही चांगलाच हात दिला आहे !

स्मिता : मग घटस्फोटाएवढं काय झालं ?

भास्कर : दोघांनाही वाटलं -- बास झाला एवढा सहवास ! आता कंटाळा आला !

स्मिता : तरीही मुलं आईच्या बाजूची झाली !

भास्कर : म्हटलं तर माझं दारूचं व्यसन आणि सेक्सबाबतचा माझा हावरटपणा ! बाहेरही ! ( शांतता.)

स्मिता : तीही डाव्या विचारसरणीचीच होती, त्यामुळं घटस्फोट तरी छान, शांततेत झाला !

भास्कर : परस्पर संमतीनं !

स्मिता : कसा वाटतोय एकटेपणा ?

भास्कर : वाचणं, विचार करणं, लिहिणं !

स्मिता : नाट्यपरीक्षणं वगैरे आहेत ना चालू ? हेमंत नाही लिहीत आता कुठं ! क्वचित कधीतरी लिहितो. एके काळी तुम्ही दोघंही बऱ्यापैकी नाट्यसमीक्षक होता ! उपजीविकेसाठी दुसरं काही करणं आवश्यकच होतं तुम्हाला दोघांनाही, पण त्या दुसऱ्या काहीनंच हेमंतचा कब्जा घेतला आणि त्याचं लेखन जवळजवळ बंदच पडलं !

भास्कर : आता समीक्षणं नाही लिहीत पण नाट्यविषयक असं लिहितो मधून मधून ! ते जाऊं दे ! मुलं काय म्हणतायत ?

स्मिता : मी बघतच होते की या विषयावर कशी आणतोयस तू गाडी ! मुलं ! विशेषत: धाकटा ! तुझा !

भास्कर : अगं, तसं नाही --

स्मिता : थोरला अमेरिकेत आहे आणि धाकटा बंगलोरला ! दोघंही संगणकवाले ! दोघांचीही लग्नं झाल्याचं --

भास्कर : मला माहीत आहे ते !

स्मिता : खूप वर्षांनी भेटलं की काय माहीत असेल, काय माहीत नसेल याचा गोंधळ होतो ! तसे आपले नियमित संपर्कही राहिले नाहीत !

भास्कर : मी नागपूर, तुम्ही पुणे -- दोघांचंही जाणंयेणंच झालं नाही ! असो. तर धाकटा !

स्मिता : थोरला विश्वास आणि धाकटा विनय ! तुझा ! तुझी छापही वाटतेय चेहऱ्यावर !

भास्कर : पगारबिगार दणकून असेल ? बायको काय करते ?

स्मिता : पगार पंचवीसपर्यंत आहे. बायकोही नोकरी करते. तिचा पंधरापर्यंत.

भास्कर : छान आहे ! आम्ही रिटायर होतानाही जिथे पोचू शकलो नाही तिथे ही पिढी सुरुवातीच्या दोनतीन वर्षांतच पोचतेय !

स्मिता : ही क्रांती मात्र झाली !

भास्कर : ( क्षणभराने --) रशियन क्रांतीनंतर त्यांनी अंमलात आणलेल्या तत्त्वज्ञानाबद्दल खूप बोलायचो आपण तरुणपणी !

स्मिता : विशेषत: त्यांचे स्त्रीपुरुष संबंधांतले प्रयोग !

भास्कर : स्त्रियांना -- धुणी, भांडी, स्वैपाक, मुलांचं संगोपन आणि मुख्य म्हणजे आर्थिक अवलंबित्व -- यांतून मोकळं केल्याशिवाय समानता प्रस्थापित होणंच शक्य नाही -- हे त्यांचं म्हणणं आजही खरं आहे ! ते नुसतं म्हणून थांबले नाहीत ! जगातला अत्यंत धाडसी असा प्रयोग त्यांनी प्रत्यक्ष अंमलात आणून पाहिला ! एकत्र राहणाऱ्या स्त्रीपुरुषांनी आपण लग्नाचे आहोत -- हा व्यभिचार नाही -- असं मानलं म्हणजे पुरे -- लग्न नोंदवायची गरज नाही -- नुसत्या एकाच्या इच्छेनंही घटस्फोट ! मुलं सगळी राष्ट्राची संपत्ती म्हणून राष्ट्राला अर्पण करायची -- देश त्यांना सांभाळणार -- त्यांची काळजी घेणार ! आणि धुण्यासाठी असंख्य लाँड्र्या आणि जेवणासाठी सरकारी खानावळी ! घरी ही काही कटकटच ठेवायची नाही ! -- केवढा प्रचंड प्रयोग होता हा !

स्मिता : पण फेल गेला ! अपेक्षेसारखा जनतेचा सहभाग याला मिळाला नाही -- जो मिळाला तो विपर्यस्त पध्दतीनं मिळाला ! त्याला स्वैराचाराचंच रूप आलं ! हंगामाच्या वेळी मनुष्यबळ लागतं तेव्हा लग्नं करायची आणि हंगामाची कामं झाली की घटस्फोट घेऊन बायकांना हाकलून द्यायचं -- असं झालं ! लाँड्र्या, खानावळींची कामंही निकृष्ट होती आणि शासनाकडून होणारं मुलांचं संगोपनही वाईटच होतं ! एकूणात स्त्रियांसाठी आणलेल्या योजनेनं स्त्रियाच भरडल्या गेल्या ! शेवटी पुन्हा गाडी मूळ पदावर आणावी लागली ! लग्नं रजिस्टर करणं -- घटस्फोटासाठी कायदे वगैरे !

भास्कर : विचार आदर्श होते, पण कुठलेही आदर्श हे माणसाच्या मनामार्फतच अंमलात येणार असतात हे विसरलं गेलं !

स्मिता : मग आपलं काय झालं म्हणायचं ?

भास्कर : आपण मोकळ्या विचारांचेच होतो ! हेमंतलाही हे सगळं पटत होतं ! इथल्या परिस्थितीची बंधनं नसती तर आपलं जगणं वेगळं झालं असतं !

स्मिता : त्यामुळं, अपराधी भावनेशिवाय आपले संबंध झाले पण इथल्या परिस्थितीमुळं आपण ते हेमंतपुढं बोललो नाही ! गुप्त ठेवावं लागलं म्हणजे व्यभिचारच झाला म्हणायचा तो ! मग अपराधी भावनेशिवाय तरी कसं म्हणावं ?

भास्कर : हेमंत इथं नसताना मी चार दिवस इथं राहिलो होतो तेव्हा एकाच मुक्कामात घडलं हे ! वारंवार नाही !

स्मिता : तेच ते !

भास्कर : मला वाटतं, आपण बोलू या हे आता -- सांगू या त्याला -- आता काय फरक पडणार आहे !

स्मिता : तसा फरक पडेल न पडेल पण एवढी वर्षं आपण हे त्याच्यापासून लपवलं याचं दु:ख होऊ शकेल त्याला ! आणि आता गरज काय आहे त्याची ?

भास्कर : गरज आहे !

स्मिता : कसली गरज ?

भास्कर : गेले काही दिवस माझ्या डोक्यात एक विचार घोळतोय -- तेच तेच मनात येतंय --

स्मिता : काय ?

भास्कर : मृत्यूपत्रानं माझी सगळी प्रॉपर्टी विनयच्या नावानं करावी -- ती दोन पोरं आता मी माझी समजतच नाही --

स्मिता : करून टाक मग --

भास्कर : तसं नाही -- तू म्हणतेयस हे एक ठीक आहे -- मलाही पटतंय -- पण खरंच तो माझा आहे का, हा प्रश्न जरा --

स्मिता : यात हेमंतचा काय उपयोग ?

भास्कर : नाही, मला जरा वेगळंच सुचवायचं आहे -- म्हणजे ती गोष्ट आपल्या तिघांच्या संमतीनंच व्हायला हवी -- एक तर आपण पुरोगामी विचारांचे आहोत आणि मुख्य म्हणजे आता वयंही बरीच झालीयत -- आपली --

स्मिता : बरं, मग ?

भास्कर : माझ्या मनात आहे की डीएनए तपासणी करून खात्री करून घ्यावी -- म्हणजे माझा हा प्रॉब्लेम खरोखर समाधानानं सुटेल --

स्मिता : म्हणजे तुझा नसला तर कशाला त्याला द्यायची मालमत्ता -- असं ?

भास्कर : एवढी मोठी गोष्ट अंदाजानं कशाला नं ? ( शांतता. )

स्मिता : नाव तेच राहू द्यायचं का बदलायचं ?

भास्कर : नावाचं काही नाही ! तेच राहू दे !

स्मिता : आपली वयं झालीयत हे ठीक आहे पण विनय आणि त्याची बायको तरुण आहेत -- त्यांनाही कळू द्यायचं ?

भास्कर : एकदा आपली तिघांची तत्त्वत: सहमती झाली म्हणजे मग अंमलात कसं आणायचं ते ठरवता येईल – तो काही एवढा मोठा प्रॉब्लेम नाही --

स्मिता : सगळा विचार करूनच आलायस म्हणजे तू --

भास्कर : हं, तसंच समज --

स्मिता : तू तुझा प्रॉब्लेम इतक्या पर्सनल लेव्हलला आणावा आणि दुसऱ्यांनी मात्र पुरोगामी आणि ओपन राहावं !

भास्कर : शक्य तर -- मी सक्ती थोडीच करू शकणार आहे ?

स्मिता : मला नाही वाटत की हे बोललं गेलं तर होणाऱ्या कोणत्याच परिणामांची खात्री देता येईल – अनपेक्षित काही घडलं तर ? हेमंतला धक्का सहन नाही झाला तर ?

भास्कर : आपण या विषयावर पूर्वी इतक्या चर्चा केलेल्या आहेत आणि परंपरेतून आपले विचार इतके सोडवून घेतलेले आहेत की त्याला धक्का बसेल असं मला वाटत नाही --

स्मिता : तुझ्या मनाप्रमाणे होण्यासाठी हे गृहीत धरू इच्छितोयस तू -- आणि तुला खात्री करून कशाला हवीय ? मी म्हणतेय ते खरं आहे असं गृहीत धर आणि घे निर्णय !

भास्कर : तो होतोय खरा माझा प्रॉब्लेम -- खात्री पटावी असं वाटतच राहतंय --

स्मिता : नाही तरी काय होणार आहे तुझ्या प्रॉपर्टीचं ? खात्री न पटता देऊन टाक विनयला ! चर्चाच नको !

भास्कर : ती दोन मुलं गेली तरी माझा आणखी एक मुलगा आहेच असं मानसिक समाधानही हवंय मला -- माझ्या मुलानंच माझ्या संपत्तीचा वारस व्हायची ही संधी आहे --

स्मिता : घे ना संधी -- पण मनातल्या परंपरेचा क्षुद्रपणा सोड -- तुझ्या क्षुद्रपणासाठी बाकीच्यांनी उदार व्हावं अशी अपेक्षा करतोयस तू --

भास्कर : आहे खरं असं -- सक्ती नाही -- जमलं तर तुम्ही एवढं करू शकाल माझ्यासाठी -- कुणाला कळणारही नाही --

स्मिता : विनयलाही ?

भास्कर : तसंही जमवता येईल ! त्याची नखं, केस, त्यानं वापरलेला टावेल, रुमाल -- काहीही चालू शकतं --

स्मिता : साडेचारला फोन आणि पाचला येणं ! योग्यच होतं रे बाबा तुझं ! ( उठून आत जात -- ) बस – आलेच ! ( काही क्षणांनी ती पाणी आणते, देते. ) बस -- चहा टाकते --

भास्कर : अगं, एवढी काही गरज नाही लगेच चहाची --

स्मिता : बस, आलेच दोन मिनिटांत -- ( जाते. भास्कर बसलेला. क्षणभराने उठतो. टेबलावर असलेली पुस्तके चाळून पाहतो. ’ क्रांतीकडे प्रवास ’ हे एका पुस्तकाचे नाव मोठ्याने वाचतो. जरा चाळून पुन्हा जागेवर येऊन बसतो. स्मिता चहाची कपबशी घेऊन येते. ) – हं -- चहा घे -- मी चहा बंदच केलेला आहे -- तू घे -- ( तो कपबशी हातात घेतो. ) आपल्या विचारांचा एक प्रत्यक्ष उपयोग सांगते. आमच्या या भागात राहणारी रोहिणी नावाची एक मुलगी येत असते मधूनमधून माझ्याकडे. ती म्हणते, तिला माझ्याशी बोलायला आवडतं. ती आणि तिचा मित्र परम अगदी ठरवून, लग्न न करता एकत्र राहतात.

त्यांच्या जगायच्या या पध्दतीमुळं नातेवाईक, मित्र बरेचसे तुटलेले आहेत. त्या दोघांना मी मुळीच अपराधी मानत नाही, त्यामुळं तिला फार आपुलकी वाटते माझ्याबद्दल !

भास्कर : छान आहे ! हे बघ, समज, रशियात त्यावेळी जे विचार होते आणि जे वातावरण होतं तेच इथंही असतं – अं -- आपल्याला पटतच होतं नं ते सगळं -- तर या सगळ्याचा अर्थ थोडक्यात काय झाला असता ? तो दौऱ्यावर गेलेला असताना तू त्याच्याशी घटस्फोट घेतला होतास, माझ्याशी लग्न केलं होतंस, चार दिवसांनी तू माझ्याशी घटस्फोट घेतलास आणि तुला पुन्हा त्याच्याशीच लग्न करायचं होतं ! -- आणि पुन्हा त्याच्याशीच लग्न करायचं होतं तर हे मधलं कशाला सांगत बसा -- असा तू विचार केलास ! -- ठीक आहे ना हे ?।

स्मिता : चहा घे -- गार होईल ! ( क्षणभराने -- ) अती ताणलं की बालिशपणा होतो ! ते विचार आणि ते वातावरण या देशात कधीच अंमलात आले नाहीत हाच खरा प्रश्न आहे !

भास्कर : एक्झॅक्टली ! माझाही तोच आहे प्रॉब्लेम । समजून घे !

स्मिता : मरता मरता व्यभिचारी म्हणवून घ्यायचा हा सगळा प्रकार होणार आहे ! नाही म्हटलं तरी अपराधी भाव आहेतच मनात पण आता शिवाय कदाचित हेमंतच्या नजरेतला तिरस्कारही सहन करावा लागेल --

भास्कर : आपल्या पुरोगामीपणाचा प्रत्यक्ष जगण्यात आपण थोडा तरी उपयोग केला पाहिजे – परिस्थितीनुरूप --

स्मिता : तू तुझी संपत्ती पक्षकार्याला देऊन टाक मग -- वारस कशाला शोधत बसतोस --

भास्कर : तो मात्र गोंधळ आहे खरा -- कुठं पुरोगामी विचार वापरायचे आणि कुठं इथली परिस्थिती मान्य करायची -- याच्यात मतभेद होत राहणार -- आणि गोंधळही ! --

स्मिता : आणि शेवटी तुझ्याबद्दल सहानुभूती हाच तुला तोडगा हवाय --

भास्कर : या सगळ्या प्रकारात तुझं सहकार्य मिळवणं हाच पहिला टप्पा होता -- त्यामुळं वेळ वाया न घालवता आधी तुझ्याशी बोलून घेणं महत्त्वाचं होतं --

स्मिता : आणि माझ्याही मनात असाही एक विचार येतोय की मनात अपराधी भाव घेऊन मरण्यापेक्षा सरळ मोकळ्या कबुलीचे परिणाम भोगून मरावं -- प्रतारणा नकोच --

भास्कर : त्यासाठीही ही संधी आहे आणि निमित्त आहे --

स्मिता : ( क्षणभराने -- ) युरोपात काही ठिकाणी समाजातल्या कमकुवत घटकांच्या प्रतिनिधींनी सभापतींच्या डाव्या हाताला बसायची पध्दत होती, त्यामुळंच त्यांना ' डावे ' म्हणायची पध्दत पडली -- आपण मात्र नैतिकदृष्ट्या कमकुवत घटकांचे प्रतिनिधी झालो, असं होऊ नये म्हणजे झालं !

भास्कर : पारंपरिक नैतिकता आपण मनापासून मानतो कुठे ?

स्मिता : अपराधी भाव मनात न येता जर ती कृती घडली नसेल तर आपण ती नैतिकता स्वीकारतो हाच त्याचा अर्थ !

भास्कर : गोंधळाशिवाय आणि पूर्ण समजुतीनं जगता येईल का, हा तत्त्वज्ञानाच्या किंवा अध्यात्माच्या क्षेत्रातला प्रश्न आहे ! आपल्याला कोणतेच गूढ मार्ग मान्य नाहीत ! आज आणि इथे भौतिक स्तरावर काय ते घडायला हवंय !

स्मिता : वैचारिक पध्दतीनं आणि गोंधळाशिवाय !

भास्कर: होय, वैचारिक पध्दतीनं आणि गोंधळाशिवायच ! ( शांतता. )

स्मिता : ( क्षणभराने -- ) तुला भेटून आनंद होईल हेमंतला !

भास्कर पारंपरिक विचारानं वाटणाऱ्या अपमानामुळं -- किंवा विश्वासघातामुळं -- तो माझ्या मैत्रीचा आनंद घालवायला तयार होईल का -- हेच आता बघायचं आहे !

स्मिता : आणि माझ्या जुन्या, मुरलेल्या प्रेमाचा आनंद ! त्या बाबतीतली मधली ही सगळी वर्षं कशी नाकारणार तो ? अज्ञानामुळं आनंदच घेत आलाय तो माझ्या सहवासाचा ! माझ्या स्वैपाकपाण्याचा !

भास्कर : भावनिक आसक्ती, मालकी हक्काची भावना या गोष्टी फक्त स्त्रीचंच नुकसान करतात असं नाही -- पुरुषाचंही करतात -- हे सगळं नाकारणारी समाजरचना कुठं, कधी अस्तित्वात येईल, कोण जाणे !

स्मिता : त्याला सांगावं याला माझीही मान्यता आहे -- पण सांगायचं काम तुझं तू कर --

भास्कर : माझं मी ?

स्मिता : माझा चेहरा अपराधी होईलच की ! बोलणंच ते ! ( आता काही क्षण प्रकाश जरा मंद होतो. संगीत. त्यांचे काही बोलणे चालू आहे. काही वेळ गेल्याचे सूचित व्हावे. नंतर -- )

भास्कर : या सगळ्या बोलण्याचा थोडक्यात सारांश सांगू का ? -- तो असा -- चाळीस वर्षांपूर्वीच्या एखाद्या गोष्टीवर आता चिडण्यातला निरर्थकपणा आणि त्यासाठी सध्याचे सवयीचे स्वार्थ घालवून बसण्यातला मूर्खपणा -- याच दोन गोष्टींचं हेमंतला महत्त्व वाटेल ! शिवाय या दिशेनं त्याला पुरोगामी विचार उपयोगी पडतीलच !

स्मिता : बघू ! त्या बाबतीत -- (इथे फोनची रिंग वाजते. ती जाऊन फोन घेते.) हॅलो ! हं, अरे वा ! तूच बोलतोयस ! (बाहेर -- भास्करला --) विनयचाच फोन ! अरे, तुझाच विषय चालला होता ! – अरे, ‘ कसा काय ‘ म्हणजे काय ? तुला भास्करकाका आठवतात ना -- ते आलेत -- हो, खूप दिवसांनी आलेत ! ते चौकशी करत होते तुझी, ... विश्वासची ! आणि आत्ता कसा काय फोन केलास ? हं, लौकर आलायस म्हणून, ओके ! नाहीतर हेमंत असतानाची वेळ असते आपली ! बरं, दीप्ती काय म्हणतेय ? (बाहेर -- ) म्हणजे सून ! हं, आणि ओंकार? (बाहेर -- ) ती दोघं आपल्यातली नाहीत, त्यांना आवडतं

' ओंकार ' वगैरे ! हं, ठीक ना  सगळे ?! छान ! या भास्करकाकांचा दांडगा अभ्यास आहे बरं का -- विचारांचा, चळवळींचा -- गरिबीचं उदात्तीकरण नाही करत आम्ही, गरिबांची बाजू घेतो – ( बाहेर -- ) तो म्हणतो, म्हणे, गरीब राहणं ग्रेट असं हॅमर करतो आपण -- त्यामुळं श्रीमंतीचं आकर्षणच मारतो म्हणे आपण -- बरं, जाऊं दे ते -- नेहमीचंच तुझं -- (बाहेर -- भास्करला --) बोलतोस त्याच्याशी ? ( भास्कर फोनसाठी हात पुढे करतो. ) अरे, ते काका बोलतायत बघ तुझ्याशी -- हं -- ( ती भास्करकडे फोन देते. )

भास्कर : कसा आहेस बाळ ? अरे, सॉरी ! आता तुला बाळ आहे, हे आहे रे माहीत ! पण एक सांग, वात्सल्यभाव काय फक्त मातेलाच असतो आणि ..... पुरुषाला नसतो असं थोडंच आहे ? तू अनुभवत असशीलच की ! ते असो ! खूप दिवसांनी तुझा आवाज कानावर पडला ! खूप बरं वाटलं ! तुम्हाला सगळ्यांना पाह्यचंय एकदा ! हो, हो, आणू या की तो योग ! आणि न जाणो, कदाचित लौकरच येईल तो योग ! बघू ! अच्छा बेटा ! देतो हं आईकडे ! ( तो फोन परत देतो. )

स्मिता : काही नाही ... आठवणी ... गप्पा ... हेमंतही येईलच ... ठीक आहे, ठेवते मग ... नीट राहा सगळे ... अच्छा ! ( फोन ठेवते. ) बरं, मी जरा आता स्वैपाकाचं बघते, तू बस वाचत काहीतरी -- तिथली टेबलावरची पुस्तकं बघ --

भास्कर : बोलण्याची स्टाईल थोडी हेमंतसारखी वाटते पण --

स्मिता : लहानपणापासून तीच स्टाईल हॅमर झालीय !

भास्कर : ठीक आहे, ठीक आहे, जा तू -- ( ती जाते, तो उठतो, टेबलावरची पुस्तके पाहतो. मघाचे पुस्तक उचलतो. ) ' क्रांतीकडे प्रवास ' -- बघू -- ( येऊन वाचत बसतो. इथे हे दृश्य संपते. पुढच्या दृश्यात हेमंत घरी आलेला असून तो घरच्या कपड्यांत आहे. अर्थातच पंचाहत्तरचा. आतून एक दारूची बाटली आणि ग्लासेस घेऊन येतो.)

हेमंत क्वचितच कधीतरी घेण्यासाठी ठेवलेली आहे ही ! आता वयाचा विचार करून उत्तम क्वॉलिटीची आहे ! तू आलायस म्हणून आज घेऊ दोनदोन पेग ! आनंद करू !

भास्कर : छान, छान ! ( स्वत:शीच --) च्यायला, मी आलोय कशासाठी आणि हा साजरं करतोय माझं येणं ! ( उघड -- )  पूर्वी आपण म्हणायचोच की धर्म ही माणसाची अफू आहे आणि दारू ही माणसाची दारूच आहे ! ( हसतात. ) स्मिता म्हणत होती, तू काही लिहीत नाहीस हल्ली !

हेमंत : अपेक्षाभंग झाला रे सगळा ! सामाजिक बदलाची निकड जाणवणारा, त्यासाठी आवश्यक ते राजकीय प्रक्रियेचं भान असणारा आणि त्या दिशेनं सदोदित कार्यरत असलेला असा ताकदवान नाटककार आलाच नाही मराठीत ! घरगुती भावभावना हाताळत बसणारेच फार ! किरकोळ काही  बरे म्हणता येतील असे झाले प्रयत्न, पण नाहीच ते !

भास्कर : असं का झालं असावं ? आपण त्या वेळी एका प्रश्नावर चर्चा करायचो -- सामाजिक परिस्थिती जर माणसाचं मन घडवत असेल तर ती परिस्थिती बदलावी असं वाटण्याचं स्वातंत्र्य मनात कुठून येतं ?

हेमंत : हा प्रश्नच आपण क्रांतीविरोधी ठरवला होता शेवटी !

भास्कर : आपल्या विचारसरणीला सोयीस्कर तात्त्विक बोलणं आपल्याला मान्य होतं पण तात्त्विक वाद आपल्याला मान्य नव्हते ! मला वाटतं अजूनही ते चालणारच नाहीत ! कारण असले वाद हे जनरली अध्यात्मिक बोगसगिरीच्या क्षेत्रातले असतात !

हेमंत : आता हे एकवीसावं शतक ! मला तर निराशाच वाटतेय ! हा समाज वर्गविग्रहाच्या नाशासाठी कटिबध्द होईल कधीतरी -- ही कल्पनाही दुरावत चाललीय ! हे अटळपणे घडेल असा आपला विश्वास होता ! ( ग्लासेस वाटत -- ) घे !

भास्कर : ( ग्लास घेऊन -- ) चीअर्स फॉर लेफ्टिस्ट मूव्हमेंट !

हेमंत : चीअर्स ! ( क्षणभराने -- ) मला तर कधीकधी अशी शंका येते की इथल्या कलाक्षेत्राचं आपण नुकसान केलं की काय -- आपणच असं नव्हे -- मूल्यमापनाच्या एकूणच प्रक्रियेवर -- पुरस्कारप्रदानावर -- कलाकारांना प्रसिध्दी मिळण्यावर -- एकूणच -- डाव्यांचा प्रभाव होता ! उभरत्या पिढीला मिसगाईड करत होतो का आपण ? तसं नसेल तर इतक्या वर्षांत एकही प्रभावी नाटककार का होऊ नये असा ?

भास्कर : मला अशी शंका येत नाही -- आजही मला आपलं बरोबरच वाटतं ! समाजच स्वतंत्र नसेल, पिळला जात असेल, पंधरा पंधरा तास काम करत असेल तर माणसाचं जगणं नव्हेच ते ! अशा वातावरणात संस्कृतीच्या गप्पा व्यर्थच आहेत !

हेमंत : मला सुरुवातीला शंका यायची की डाव्या विचारसरणीच्या आदर्श परिस्थितीत कलाकृती निर्माणच होणार नाहीत; कारण स्वार्थ नाही, संघर्ष नाहीत, प्रश्न नाहीत ! पण नंतर मी मान्य करायला लागलो की कुठल्याही परिस्थितीत माणसाचे अहंकार, मानापमान, ईर्षा हे राहतीलच ! म्हणजे कलाकृतींना मटेरियल मिळत राहीलच !

भास्कर : हं -- ( स्वत:शी -- ) च्यायला, हा जर अहंकार, मानापमान मान्य करून बोलणार असेल तर याच्यातल्या पुरोगामीपणाला कितपत आवाहन करता येईल ? ( उघड -- ) पण डावी विचारसरणीच पुरोगामी असते -- हितकारक असते हे नक्की !

हेमंत : त्याच्यात शंकाच नाही -- त्याच्यात शंकाच नाही -- आण तुझा ग्लास -- ( भास्कर रिकामा ग्लास देतो. हेमंत दोन्ही ग्लास भरतो. एकेक घेतात. ) तू भेटलास ! मस्त वाटलं ! ( क्षणभराने -- ) मला तर कधीकधी असंही वाटलं होतं की विचारसरणी वेगळी असणं आणि वेगळ्याच परिस्थितीत जगावं लागणं हाच का नाही होऊ शकत नाटकाचा विषय ? नुसती सुखदु:खांची नक्षीकामं झाली आपल्याकडे ! अशा खोलातल्या प्रश्नांना कुणी भिडलंच नाही ! ( इथे स्मिता येते. )

| | |
|---|---|
| स्मिता : | स्वैपाक तयार आहे -- वय समजून घ्या -- जास्त नको -- |
| हेमंत : | दोनच पेग फक्त -- हा शेवटचाच चाललाय -- |
| भास्कर : | जास्तीत जास्त म्हणजे अजून एखादा रे -- |
| हेंमंत : | ( स्मिताला -- ) तुला ? |
| स्मिता : | तिसरा ग्लास कुणासाठी आहे मग ? |
| हेमंत : | अरे, हो हो, सॉरी -- ( ग्लास भरून स्मिताला देतो.) |
| भास्कर : | ये हुई ना बात ! |
| स्मिता : | चीअर्स ! आणि हेमंत, भास्कर आहे घटस्फोटित -- एकटा ! पूर्वीसारखा वाद नको घालूस त्याच्याबरोबर ! जे का रंजले गांजले ! सहानुभूती ठेव ! |
| हेमंत : | होय गं ! |
| भास्कर : | (स्वत:शीच --) च्यायला, जणू ही त्या गावचीच नाही ! मुख्य विषय काय आहे हे माहीतच नाही जणू हिला ! |
| हेमंत : | दे सोडून तू तिकडचं सगळं -- इकडे येऊन राहा आमच्याबरोबर -- मस्त मजेत राहू -- |
| भास्कर : | हे तर फारच छान ! बघू, कसं कसं जमतंय ते -- |
| हेमंत : | जरूर जमेल -- तू ठरव म्हणजे झालं -- |
| स्मिता : | कामात मदत करावी लागेल पण -- हेमंत करतो -- |
| हेमंत : | डाव्यांना हे सांगायची गरज नाही -- |
| भास्कर : | त्यावेळीही आपण खूप हिरीरीन वाचायचो -- चर्चा करायचो -- स्त्रियांना समानता मिळण्यासाठी रशियात जे  प्रयत्न झाले त्यातल्या एका बाबतीतला प्रश्न मला अजूनही अनुत्तरीतच वाटतो -- |
| हेमंत : | कुठला प्रश्न ? |
| भास्कर  : | आता, लग्न नोंदवायची गरज नाही -- स्त्रीपुरुष पतिपत्नी म्हणून एकत्र राहा -- दोघांपैकी एकालाही वाटलं तरी घटस्फोट घ्या -- त्यालाही कायद्याची आडकाठी नाही -- हे सगळं ठीक -- पण त्यात एक वाक्य असं आहे की आपण पतिपत्नी म्हणून एकत्र राहातोय असं त्या दोघांना वाटलं म्हणजे पुरे -- आपण व्यभिचार करतोय असं वाटू नये ! |
| हेमंत : | बरोबर आहे ना -- फ्री सेक्सचा पुरस्कार नव्हताच तो ! |
| भास्कर : | फ्री सेक्स नसू दे -- पण, अनेक संबंधांना स्वातंत्र्य आहे म्हटल्यावर ' व्यभिचार ' ओळखायचा कसा ? |
| हेमंत : | सरळ आहे -- ते पतिपत्नी म्हणून आहेत तोपर्यंत प्रतारणा करायची नाही -- |
| भास्कर : | म्हणजे मालकी हक्काचीच नैतिकता ना ! 'व्यभिचार ' हा शब्द माणसाला अपराधी वाटण्याशी संबंधित आहे ! तो पारंपरिकतेलाच बढावा देणारा शब्द आहे ! |

हेमंत : बेधुंदपणे सुखोपभोगांच्या मागे लागणं ही भांडवलवादाची खासीयत आहे -- डाव्या विचारसरणीची नाही !

भास्कर : समज ' व्यभिचारी ' वाटलं तरी सांगेल का तसं कुठलाही माणूस ? हा विश्वास कुचकामी नाही का ? आणि प्रयोग फसलेच ना ते ? स्वैराचारच झाला ! माझं म्हणणं फक्त बलात्काराला बंदी ठीक आहे ! बाकीचं बोलण्यात काही अर्थच नाही !

हेमंत : म्हणजे ' व्यभिचार ' हा शब्द भाषेत असायचीही गरज नाही असं एकूण तुझं म्हणणं !

भास्कर : तो शब्द वापरण्यात डाव्या विचारसरणीचा गोंधळ उघडा पडतो ! त्या शब्दावर वाद घालत गेलं तर सोपं जाणार नाही !

हेमंत : आपण तिघं आणि तुझी बायको --

भास्कर : मेधा --

हेमंत : हं, मेधा -- छान ग्रुप होता आपला -- एकत्र जमलो की मस्त इंटेलिजन्ट चर्चा, वाद -- दारू, जेवण --

स्मिता : खरंच --

भास्कर : आपण, काहीही असो, कमकुवत घटकांच्या बाजूचे राहिलो -- सहानुभूती बाळगली --

हेमंत : नि:संशय --

भास्कर : तर माझं म्हणणं काय आहे की ' व्यभिचार ' हा शब्द घेऊ -- शेवटी काय आहे, सामाजिक परिस्थितीच घडवणार आहे मन -- समजा अशा मनाला स्वत:ची एक कृती ' व्यभिचार ' च वाटली तर आपण काय म्हणू ?

हेमंत : आयला, ग्रेट ! पारंपरिक नीतीमत्तेचाच होईल तो प्रॉब्लेम !

स्मिता : मला प्रश्नच कळला नाही --

भास्कर : एखाद्या व्यक्तीला ' व्यभिचार ' वाटणं हे महत्त्वाचं आहे का की ' व्यभिचार ' असा काही नसतोच ? -- हा प्रश्न !

हेमंत : आयला, ग्रेट ! एक निखळ भौतिक आव्हान !

भास्कर : अजून एक पेग घ्यायचा आहे -- शेवटचा ! हा घे ग्लास -- तुझाही भर -- सत्याच्या जवळ जायला त्याचा उपयोग होईल -- आणि आपलं वय लक्षात घेता आता आपण लौकर सत्य गाठलं पाहिजे -- क्रांती होवो न होवो --

हेमंत : तू तर बोलायलाच लागलायस सत्य -- बोल -- अजून बोल -- आण ! ( त्याचा ग्लास घेतो, स्वत:चाही संपवतो. दोन्ही भरतो. स्मिता स्वत:चा संपवून आणखी एक मागते. ग्लासेस देतो. )

स्मिता : माझा हाच शेवटचा हं !

भास्कर : आमचाही ! पण आमचा तिसरा आहे, तुझा दुसरा, एवढंच ! नाहीतरी समानता आलेलीच नाही !

स्मिता : तुम्हाला जेवायला वाढायचा आनंद हा माझा तिसरा पेग असणार आहे !

भास्कर : ह्यॅ ! ट्रॅडिशनल बोलू नकोस !

स्मिता : बरं, आनंदाशिवाय वाढेन ! मला दोनच पुरेत !

हेमंत : ( तिसरा पेग घटाघटा पिऊन संपवून -- ) बरं, ते जाऊं दे सगळं ! उगीच स्टेप बाय स्टेप चर्चा नको -- तुझं काय म्हणणं ते सांगून टाक !

भास्कर उलट मी तुझे विचार जाणून घेतोय --

हेमंत : या असल्या हुशारीनं आपण हर्ट का होत नाही तर आपले विचार एका दिशेनं जातात म्हणून !

भास्कर : अर्थातच !

स्मिता : डाव्या विचारसरणीच्या आदर्श अवस्थेत अशीच फक्त तपशीलांबद्दल चर्चा, संघर्ष शक्य असतो ! चांगलं काय हे एकमतानं समजलेलंच असतं ! आधीच !

हेमंत : काही काही वेळेला ना, असली वाक्यं ऐकली की आपणच आपली चेष्टा करतोय की काय असं वाटतं मला --

भास्कर : तुझ्या आकलनातच फरक पडलाय ? काळाच्या ओघात ?

हेमंत : नाही, तसं नाही वाटत, पण निराशा येते -- खरंच !

स्मिता : खरं तर आपल्या विचारसरणीनं एकूणच, मानवजातीचंच कल्याण होईल, संघर्ष, युध्दं संपतील, सांस्कृतिक संपन्नता येईल -- हे सगळं इतकं स्पष्ट असताना का नाही घडत ते ? आनंद नकोय का माणसांना ?

हेमंत : आपलं न पटणारे खूप लोक आहेत एवढाच त्याचा अर्थ ! आणि आपल्याइतकीच खात्री त्यांना दुसऱ्या कशाचीतरी वाटते !

भास्कर : मला हे आवडतं तुझं ! तू वस्तुस्थितीला वाव देतोस ! हेकटपणा करत नाहीस !

स्मिता : हेकटपणा हवा खरं तर ! स्वातंत्र्याबद्दल ! निष्पापपणाबद्दल !

भास्कर : मानावं लागेल पण, रशियात त्यांनी सेक्सच्या क्षेत्रातही प्रयोग करून पाहिले ! कुटुंब हे युनिट वेगळं धरलं की एकूण सामाजिक क्रांतीला ते अडथळ्याचं किंवा विरोधाचं होतं हे पटल्यावर त्या अंगानं प्रयोगच केले ! आख्ख्या देशाच्या लेव्हलवर !

हेमंत : लग्न, घटस्फोट यांतले त्यांचे प्रयोग -- कसंतरी एकत्रितपणे आयुष्य रेटणे किंवा व्यभिचार यांचं उच्चाटनच करू शकणारे होते ! ते विचार तिथंही पचले नाहीत लोकांना हे दुर्दैव !

भास्कर : ते विचार यशस्वी व्हायला हवे होते असं खरंच वाटतं तुला ? जगभर पसरू शकले असते ते विचार ?

हेमंत : भौतिक जगात बदल घडवून आणायला विचारांशिवाय काही साधन नाही आणि कितीही आदर्श विचार असले तरी परंपरा, स्वार्थ, सुखलोलुपता यांचे अडथळे असतातच !

भास्कर : त्यांचं वर्गविग्रहाचं तत्त्वज्ञान यशस्वी झालं पण नेते, संघटक, व्यवस्थापक यांचा वेगळा वर्ग तयार झाला ! म्हणजे मन हे आत्मकेंद्रिच राहणार असं समजावं का काय ?

हेमंत : काही चांगले बदल घडत असतात त्यामुळं आशाही वाटते ! उदाहरणार्थ अस्पृश्यता गेलेली आहे असं म्हणता येईल ! जातिभेद गेलेले नसले तरी !

भास्कर : त्या पध्दतीनं स्त्रीपुरुष संबंधांत कोणते बदल होऊ शकतील ?

हेमंत : एक साधी गोष्ट तर होऊ शकेल -- स्त्री जर पुरुषाच्या काही चुका -- नैतिक म्हणतोय मी -- माफ करू शकत असेल तर पुरुषाला तिची एखादी तरी चूक माफ करता यावी !

भास्कर : व्हेरी गुड ! तोच आहे मुख्य विषय ! आजचा !

हेमंत : म्हणजे ?

स्मिता : मलाही प्रतारणेचं ओझं नकोय मरताना !

भास्कर : तुझ्या अनुपस्थितीत चार दिवस मी तुझ्या घरी राहिलो होतो ! तेव्हा घडलं ते ! म्हटलं तर चूक ! तुझा धाकटा -- विनय हा माझा आहे ! असं ही म्हणते !

हेमंत : ( चकित. क्षणभराने -- ) इतक्या वर्षांनी !

स्मिता : हे कधीतरी बोललं जायलाच हवं होतं !

भास्कर : बोलायचं माझं कारण वेगळं आहे --

स्मिता : मला त्या कारणात इंटरेस्ट नाही पण बोलायला अर्थातच माझी संमती आहे --

हेमंत : ( क्षणभराने -- ) ओके ! शक्यही असेल ! पण आता काय ! इतक्या वर्षांनंतर ! ?

भास्कर : मला एक सांग -- ही शक्यता ऐकल्यानंतर तुला सावरायला वेळ हवा आहे का ?

हेमंत : त्या वेळी लागला असता -- आताही थोडा धक्का आहेच ! पण कोलमडत वगैरे नाहीय मी !

स्मिता : तेवढी एकच -- म्हटलं तर चूक -- घडलीय --

हेमंत : एवढ्या वर्षांनंतर अचानक अंतरच तयार होतंय हे स्मिता आपल्यात -- मला त्याची गरज नाही वाटत -- तू -- म्हणजे एवढी वर्षं ही अपराधी भावना वागवलीस मनात ? म्हणजे हे अंतर होतंच आपल्यात ! कळलं नाही मला !

भास्कर : एकूणात तुम्हा दोघांत समजूत आणि क्लॅरिटी प्रस्थापित होण्याची प्रक्रिया घडू शकेल हे स्पष्ट आहे. माझा प्रश्न वेगळा आहे --

हेमंत : समजुतीची प्रक्रिया वगैरे नाही -- इट इज ऑल गॉन -- मला त्यात विचार कर - करून ॲडजस्ट होण्याचा प्रयत्न करायचीही गरज वाटत नाही !

स्मिता : हाच समजूतदारपणा माझ्यातही यायला हवाय ! पण आता मला वाटतं तो येऊ शकेल !

हेमंत : येईल ! विसर ते ! याच्या आधीही आपण मरू शकलो असतो -- जिवंत आहोत म्हणून हा विषय आहे

समोर !  मृत्यूनंतर माणसाच्या व्यक्तिमत्वाचीही -- त्याचे अनुभव, विचार, भावना, राग, लोभ – सगळ्यांची राख होते -- याबद्दल मला शंका नाही ! शरीर नाही, मन नाही ! शरीर खलास, सगळं खलास !

भास्कर : म्हणजे एक मोठाच टप्पा पार पडतोय हा !

स्मिता : पण नको, असं नको -- मला वाटतं आम्हाला दोघांना -- मला आणि हेमंतला -- कळायला हवंय -- नेमकं काय घडतंय आमच्या मनांत ते -- हा असा नुसताच उदारमतवाद नको --

भास्कर : ठीक आहे -- तुमचं बोलून झालं की मला सांगा -- मी आतल्या खोलीत बसतो वाचत -- ' क्रांतीकडे प्रवास ' --

स्मिता : हं -- ते ठीक होईल -- ( क्षणभराने भास्कर टेबलावरचे ते पुस्तक घेऊन आतल्या खोलीत जातो आणि दार लावून घेतो. काही क्षण शांतता. मग -- ) बोलायला हवंय हेमंत -- ( पडदा पडत जातो... )

**-- पहिला अंक समाप्त --**

**-- अंक दुसरा --**

स्मिता : बोलायला हवंय हेमंत --

हेमंत : काय बोलायचं ? माझा हर्ट होण्याचा प्रश्न आणि तुझा अपराधी भावनेतून सुटण्याचा प्रश्न -- हे आपण आपापले प्रश्न घेऊन बोलायचं एकमेकांशी ? -- की आपण एकमेकांना मदत करतोय आपापल्या प्रश्नातून सुटण्यासाठी -- असं बोलायचं ?

स्मिता : दोन्हीही लागेल -- दोन्हीचीही गरज आहे -- ( क्षणभराने --) तुला चिडावंसं वाटतंय ?

हेमंत : चिडावंसंही वाटतंय आणि शांत राहावं असंही वाटतंय -- ( स्मिता गप्प. ) -- हे सगळं जर मला पूर्वीच कळलं असतं तर ?

स्मिता : तुझी प्रतिक्रिया तीव्र येण्याचीही शक्यता होती -- उदारमतवादालाच तू बांधील राहशील अशी खात्री नव्हती -- म्हणूनच तर --

हेमंत : लपवाछपवी झाली ! -- फसवणूक !

स्मिता : पण जे झालं त्याच्यावर आपल्या सगळ्यांच्या उदारमतवादाचाही प्रभाव होता -- आपण सगळेच पारंपरिक नीतीकल्पनांना चिकटून बसणारे असतो तर भीती वाढली असती -- आणि कदाचित हे घडलं नसतं ! --

हेमंत : भीती, दबाव, मालकी हक्काचं दडपण हे सगळं असं उपयोगी पडतं ! भीतीच भीतीचं अस्तित्व टिकवायला उपयोगी !

स्मिता : यातले वैचारिक गोंधळ आपल्याला माहीत आहेत ! पण आपल्या स्वातंत्र्याच्या कल्पनांना क्लॅरिटी नाही ! भीती नाही, हर्ट होणं नाही, अपराधी वाटणं नाही -- अशा स्वातंत्र्याची कल्पना कशी करणार? मला वाटतं, त्यापेक्षा पारंपरिक पध्दत बरी आहे ! -- तू मला माफ करणं ! ( शांतता. ) तुझ्यामाझ्या संबंधात बदल काय होईल आता ? ( शांतता. ) बदल तर होईलच -- बहुतेक !

हेमंत : ( क्षणभराने -- ) आता तथ्यही नाही काही त्यात ! इतक्या वर्षांपूर्वी आपल्याला दंश झाला होता -- ते आज कळलं म्हणून आज विष चढवून घेणं ! ( शांतता. ) तुझी काय अपेक्षा आहे ? मी काय करावं ?

स्मिता : आपली विचारसरणीही टिकली पाहिजे ! एवढ्या वर्षांचं ते आता खोटं पडू नये !

हेमंत : कुणी हर्ट होत नाही, कुणी दु:खी होत नाही -- अशा अवस्थेपर्यंत पोचणारी पुरोगामी विचारसरणी माझ्याकडे नाहीय -- बहुतेक --

स्मिता : समज तुझं बरोबर आहे ! -- तर काय होईल -- बदल ?

हेमंत : आतल्या आत थोडं दु:ख होईल, त्यामुळं थोडा दुरावा वाटेल आपल्यात -- पण तो जाणवू नये -- किंवा लौकर नष्ट व्हावा -- असे प्रयत्न करता येतील --

स्मिता : म्हणजे आपल्याआपल्यातच होऊ शकेल सगळं !

हेमंत : वेडी का काय तू ? आता हे जाहीर विषय करायचे ?!

स्मिता: तुला खूप त्रास होईल या सगळ्याचा ?

हेमंत: शरीरावर काही परिणाम झाले -- तब्येतीवर -- तर खूप म्हणायचं ! अन्यथा कुठलंही दु:ख हे रूटीनच धरतो आपण ! त्याचे लाँग टर्म परिणाम आपण फारसे लक्षात घेत नाही ! आणि आपल्याला तर आता फक्त शॉर्ट टर्म परिणामच बघायचे आहेत ! फार मोठा काळ शिल्लकच नाहीय !

स्मिता: ही निराशा म्हणू की उपरोध म्हणू?

हेमंत : वास्तवाचं भान म्हण ! निराशा आणि उपरोध व्यक्त करायला जरा जास्त शक्ती लागेल !

स्मिता : चिडून बोल जरा -- शक्य तेवढं -- मला माझ्या बाजूनंही काही बोलता येईल असं काहीतरी बोल !

हेमंत : चिडून ! ( क्षणभराने --) आपल्याला खूप काही कळतं असं समजलो आपण -- वैचारिक ! मग असा गोंधळ का व्हावा ? आपोआप बरोबरच कृती का घडू नये ?

स्मिता : असं कसं चालेल रे बोलून ? भौतिकतेबरोबरच निवडीच्या स्वातंत्र्याचेही पुजारी आपण !

हेमंत : एका बाजूला आपण वैयक्तिक सुखदु:खं आणि सामाजिक सुखदु:खं असे भेद मानले आणि दुसऱ्या बाजूला सामाजिक दु:खं -- अन्याय घालवता आले की वैयक्तिक सुख आपोआप येईल असंही मानलं !

स्मिता : ते जाऊं दे सगळं ! हा तुझ्यामाझ्यातला प्रश्न आहे ! -- आपण दोघंही एकमेकांना जाणतो -- तर हा प्रश्न -- या प्रश्नापुरतंच बोलू !

हेमंत : मग -- तू हलकटपणाच केलेला आहेस !

स्मिता : ( सावरून -- ) हं ! झाला आता तुझ्यातला पारंपरिक नीतीमत्तेचा पुरुषी नाग जागा !

हेमंत : या अंगानं जे बोललं जाईल ते आधी माहीत असलं तरी तेच बोलावं लागेल ! प्रतारणाच झाली !

स्मिता : व्यभिचार म्हण ना !

हेमंत : तुला गिल्टी वाटतंय म्हणजे तेही ! प्रतारणा आणि व्यभिचार -- दोन्ही !

स्मिता : एका बाजूनं -- त्या वेळेसारखंच -- अजूनही -- मला ती काही फार गंभीर चूक वाटत नाही -- आणि तरीही तू म्हणतोयस तेही पटतंय ! एकूणात माफी मागण्याच्या मन:स्थितीत मी आहे !

हेमंत : खरोखर माफ करता येणं म्हणजे माफ करणाऱ्याच्या मनातला व्रण समूळ नष्ट व्हायला हवा ! नाहीतर नुसती शाब्दिक माफी होईल ती ! जगण्यातली नाही !

स्मिता : फक्त शाब्दिकच माफी मला पुरेल ! खऱ्या -- तू म्हणतोस तशा -- माफीची कुवत कुणात असेल का याबद्दल मला शंका आहे !

हेमंत : मग सोपंच आहे नं सगळं ! -- पारंपरिक !

स्मिता : असा एक कुठलाही समजुतीचा बिंदू सांग की तिथं राहून -- जरा त्रासानं का असेना -- उरलेलं आयुष्य बरं जाईल ! प्रश्न पेंडिंग ठेवण्यापेक्षा बरंच होईल ते !

हेमंत : हे तुझं झालं ! माझं बरं चाललं होतं ! मला कशाला हे नवीन आव्हान तयार केलं ?

स्मिता : आपण एकत्र राहतोय म्हटल्यावर माझ्या गरजांचा तुझ्यावर काहीच परिणाम होणार नाही असं कसं होईल ? आणि तुझ्या गरजांचा माझ्यावर ?

हेमंत : आहे तसं स्मूथ चालावं ही माझी गरज होती -- ती कुठं समजली तुला ?

स्मिता: नीट चालूच होतं ना -- त्यामुळं तुला ती गरज म्हणून अस्तित्वातच नव्हती ! माझं तसं नव्हतं ! मुख्य म्हणजे निमित्तही मिळालं -- आयतंच ! आणि वस्तुस्थितीला घाबरून एखादा विषय टाळायचाच हे आपल्याला शोभणारंही नव्हतं ! आणि मुख्य म्हणजे याआधी इतकी वर्षं मी कुठं बोलले होते ? न बोलण्यामागं नुसतीच माझी भीती नव्हती -- तुला त्रास होऊ नये हाही विचार होताच !

हेमंत : सगळेच चांगले आणि सज्जन तिच्यायला ! लोकांना वाटतं की संघर्ष म्हणजे नुसता आरडाओरडा, मारामारी, कार्टकचेऱ्या, पोलीस ! त्यांच्यापेक्षा या आपल्यासारख्या -- असल्या सज्जन संघर्षांचं प्रमाण किती प्रचंड आहे ! सगळीकडे आणि क्षणोक्षणी !

स्मिता : आपल्याला विचारसरणी एकच पटत असली तरी या प्रश्नाकडे आपलं पाहणं वेगवेगळं होतंय -- त्याला काय करणार ? ! हा प्रॉब्लेम एखाद्या विचारसरणीला कसा ओलांडता येईल ?

हेमंत : कुठल्याही विचारसरणीची आदर्श स्थिती ही -- आनंदानं जगणं -- हीच असते ! असायला हवी !

स्मिता : तरीही आपण तुलनात्मक विचार करूनच निवडतो -- विचारसरणी !

हेमंत : ते तर योग्यच आहे ! त्याशिवाय एखादी विचारसरणी मान्य करण्यात थ्रिल काय असणार ? ! आपण बोलतोय पर्सनल प्रॉब्लेमबद्दल -- पण सवयीमुळं तेही थिऑरेटिकल बोलल्यासारखं वाटतंय ! -- जणू काही एखाद्या अभ्यासाच्या विषयाबद्दल चाललंय आपलं बोलणं ! -- पण आहे -- तरीही ते संबंधित वाटतंच आहे म्हणा !

स्मिता : दुसरा पर्याय म्हणजे -- भांडण, बीपी वाढवणे, हार्टअ‍ॅटॅक -- या मार्गानं जाणारा आहे ! शक्यतो हा वेडेपणा टाळण्याइतपत रॅशनल आहोत आपण !

हेमंत : दु:खी होतोय म्हणजे मला वाटतं तोही मार्ग आपण टाळूच याची खात्री नाही ! एखाद्या वेगळ्या परिस्थितीत -- किंवा अजूनही, याच परिस्थितीतही -- विसरून जाऊ कदाचित आपण सगळी सो कॉल्ड रॅशनॅलिटी ! बुध्दिवाद ! -- विवेक ! ( शांतता. )

स्मिता : विनयबाबतही बदलेल वागणं तुझं ?

हेमंत : मला वाटतं मी जाणवू देणार नाही ! -- त्याला !

स्मिता : म्हणजे विस्कटणारच थोडंफार !

हेमंत : तू सांग मग समजुतीचा बिंदू -- जिथं आपल्याला दोघांनाही पोचता येईल आणि स्थिरावता येईल असा !

स्मिता : मला वाटतं आपली इच्छा एकच आहे -- आता काहीही डिस्टर्ब व्हायला नकोय आपल्याला !

हेमंत : ही इच्छा तर असतेच आणि आता या वयात तर जास्तच ! पण त्याचा उपयोग काय ? तुझं तर सगळं पूर्वीच डिस्टर्ब झालंय ! माझं आज !

स्मिता : यापुढच्या काळाचं म्हणतेय मी !

हेमंत : हं !

स्मिता : याचा शक्य तितका निचरा व्हावा आणि शक्य तितकं मोकळं जगता यावं !

हेमंत : ' याचा ' हा यातला शब्द काढून टाक ! शक्य तितका निचरा व्हावा आणि शक्य तितकं मोकळं जगता यावं ! बोधवाक्यच आहे हे ! ग्रेट !

स्मिता : मला काळजीही वाटतेय ! तू जास्त अपमानित वाटून घेऊ नकोस ! प्रॉब्लेम होणार नाही या विश्वासानं मी हा कबुलीचा मार्ग पत्करलाय !

हेमंत : तुझा कंट्रोल काय पण माझ्यावर ? अंदाज फक्त !

स्मिता : अंदाज नाही -- विश्वास !

हेमंत : मान्य !

स्मिता काय?

हेमंत : हेच ! प्रॉब्लेम होऊ न देण्याचा प्रयत्न करणं !

स्मिता : मला भीतीच वाटतेय पण ! ( शांतता. )

हेमंत : भास्करबाबत मात्र, मला वाटतं, मैत्री संपेल आता आमच्यातली ! ती टिकवायची गरजही नाही !

स्मिता : मला वाटतं हेही नको होऊ देऊस ! त्याला अपमानित करण्यानं काय साध्य होणार आहे ?! फक्त एक प्रकारे त्याला शिक्षा देणं ! म्हणजेच तुझं हर्ट होणं फिक्स करणं !

हेमंत : मला काय संत हेमंत करायचंय का काय ? संत महंत हे आपण विचारात घेत नाही !

स्मिता : ( क्षणभराने --) रोहिणी हल्ली मधूनमधून सारखी भेटते ! ती आणि परम यांनी लग्न न करता एकत्र राह्यचं ठरवलं, दोघांच्या संमतीनं मूलही होऊ दिलं त्यांनी ! पण आता कुरबुरी चालू झाल्यायत ! कदाचित वेगळं होण्याच्या मार्गानं चाललंय सगळं ! इतकं ती दाखवत नाही, माझा अंदाज --

हेमंत : होतीलही वेगळे ! ती शक्यता त्यांनाही माहीत आहे ! पण खरे धाडसी ! दोघांचेही नातेवाईक तुटले ! तरीही !

स्मिता : विचारानं किती एकरूप असतील ते ! तरीही ! प्रश्न आहेतच !

हेमंत : प्रश्न नाहीसे होतील असा क्लेम करण्यापेक्षा कमी होतील असं म्हणावं -- ते जास्त बरोबर होईल ! किंवा आहेत त्यातले कमी होतील असं म्हणावं -- कारण नवे प्रश्न येतील ते वेगळे !

स्मिता : तिला वाटतं माझ्याशी चर्चा करून, कसं वागायचं ते तिला जास्त क्लिअर होत जाईल ! पण आता माझी मलाच शंका वाटतेय !

हेमंत : तिला तुझी मदत होण्यासाठी, मला वाटतं, तुला कॉन्फिडन्स असायची गरज नाही ! तिला क्लॅरिटी वाटत असेल तर त्यात अडथळा कशाला आणायचा ?

स्मिता : माझी योग्यता नाही !

हेमंत : तिनं ठरवलीय तुझी योग्यता ! संत स्मिता ! गुरू कसा आहे हा प्रश्नच नसतो -- गुरूवरची आपली श्रध्दा खरी असली की मोक्ष मिळतोच !

स्मिता : अध्यात्मिक सगळं !

हेमंत : त्याच्यावर टीका करायची म्हणून तेही वाचलंच ना आपण !

स्मिता : माझं तुझ्याइतकं नाही झालं वाचन !

हेमंत : म्हणजे आता, वाचन जास्त होण्यावर क्लॅरिटी अवलंबून ठेवायची का काय आपण ?

स्मिता : तेही लागतंच ना ! चर्चेसाठी -- वादासाठी !

हेमंत : आपला आत्ताचा प्रश्न काय आहे ?

स्मिता : भास्कर वाट पाहतोय ! त्याला आणखी काही बोलायचंय ! कुठं पोचतोय आपण ? आपल्याआपल्यात होतेय का काही क्लॅरिटी ?

हेमंत : ( क्षणभराने -- ) योनिशुचितेचा प्रश्न काढला तर पुरोगामीपणानं वागून बावळट ठरावं की इथल्या कल्चरप्रमाणे वागून तुला हाकलून द्यावं आयुष्यातून -- असे प्रश्न येतील -- मुलांवरही त्याचे परिणाम होतील -- म्हणून नकोच ते -- आपल्यात खूप मोठा असा काही विध्वंस होऊ शकत नाहीय -- हीच आपली क्लॅरिटी ! याही क्लॅरिटीत एकमेकांना कमीजास्त न लेखता निर्धास्त राहू !

स्मिता : सध्या तरी मला रिलीफ वाटतोय ! -- भास्कर गेल्यावरही काही काळ ही क्लॅरिटी खरी ठरली तर मीही विश्वास ठेवीन तिच्यावर !

हेमंत : आपण बरंचसं काही म्हणजे पुरेसं बोललोय आणि त्याच्यातून आपण इथपर्यंत पोचलोय असंच वाटतंय मला !

स्मिता : मग बास ! हेच हवं होतं ! नुसतं अंदाजात किंवा विश्वासात राहण्यापेक्षा हे बरं झालं !

हेमंत : ठीक झालं ! बोलावू का त्याला?

स्मिता : नाइलाज म्हणून नव्हे, समजुतीनं मला माफ कर आणि बोलाव त्याला --

हेमंत : तेच ! दुसरं काय ! ( जाऊन भास्कर बसलेल्या खोलीच्या दारावर टकटक करतो -- ) भास्कऽर !

भास्कर : ( आतून -- ) हो -- आलोच -- ( दार उघडून बाहेर येत -- ) झालं बोलणं ? छान !

हेमंत : ' छान ' काय ! काय झालं असेल असं तुला वाटतं?

भास्कर : हे बघ, आपल्याला एक वैचारिक क्लॅरिटी आहे, आपण बुध्दिवाद मानतो --

हेमंत : बरं, मग ?

भास्कर : त्यामुळं आता पुढचा मार्ग मोकळा होईल आणि आता माझाही प्रश्न विचारार्थ घेता येईल – दुसरं काय ?!

हेमंत : कुठला, कसला प्रश्न ?

स्मिता : त्याचाही होऊ दे निचरा !

हेमंत : हं -- तर -- ( टेलिफोनची रिंग वाजते. स्मिता जाऊन फोन घेते. ) खरं तर मला धारदार काहीतरी बोलायचं होतं !

स्मिता : हॅलो -- हं -- बोल – आत्ता ? -- अगं उद्या बोलू -- माझ्याकडे पाहुणे आहेत जरा -- काल तू असताना फोन आला होता ना -- तेच ! – अं ?... थांब हं जरा -- एक मिनिट ! -- ( फोनबाहेर -- ) रोहिणी ! तिचा काहीतरी अर्जंट प्रॉब्लेम आहे ! आत्ताच मला भेटायचं म्हणतेय ! थांबणं अशक्य आहे म्हणतेय ! काय सांगू ?

भास्कर : म्हणजे मघाशी जिच्याबद्दल तू बोललीस ती !

हेमंत : ये म्हणावं तिला -- आपलं बोलू नंतर -- शिवाय तिची अर्जन्सी जास्त खरी आहे -- कमी वयामुळं !

स्मिता : ( फोनवर -- ) बरं, ये मग ! काही काळजी करू नकोस ! पाहुणे असले तरी त्यांचाही तुला उपयोग होईल असेच आहेत ! ये ! वाट पाहते ! ( फोन ठेवते. ) एवढ्यात येईलच ती ! कालच आपण वाढदिवस साजरा केला तिचा ! इतकं काही जाणवूनच दिलं नाही तिनं !

भास्कर : रिअली ! ए प्रायॉरिटी केस !

हेमंत : भास्कर, तू ढोंग करतोयस ! ती प्रायॉरिटी केस आहेच ! पण तू हे नाइलाजानं म्हणतोयस !

भास्कर : आरोपच झाला हा । म्हणजे माझं मनच कळतंय तुला ।

हेंमंत : अर्थात् !

भास्कर : वैयक्तिक मनांच्या हालचाली महत्त्वाच्या न धरता चर्चा करणारे आपण !

हेमंत : वैयक्तिक प्रश्न का असतात मग ?

भास्कर : अच्छा ! क्रांतीच्या अपेक्षेला मुरड घालणंच झालं मग हे !

हेमंत : ' मुरड ' या शब्दाचा अर्थ तरी निदान मला तुझ्यापेक्षा नक्कीच खूपच जास्त समजतो ! आता !

भास्कर : ' मला अमुक एक जास्त समजतं ' अशी कधीच आपली चर्चेची पध्दत नव्हती ! ' विचार ' हे साधन होतं चर्चेचं ! ऑथॉरिटी नव्हे !

स्मिता : बरं, ठीक आहे ते सगळं ! रोहिणी येतेय ! आपण तिघंही तिच्या बाजूनं -- तिला मदत करणार आहोत !

हेमंत : हं -- ' तिच्या बाजूनं ' -- हे महत्त्वाचं !

भास्कर : कितीही झालं तरी ती वीकर सेक्शन आहे ! आपण तिची बाजूच बरोबर आणि न्याय्य धरणार ! प्रश्नच नाही !

स्मिता : रडवेली झाली होती फोनवर -- त्यांच्या कुरबुरी चालल्यायत इतपत ती मला सांगायची पण हे जरा वेगळं दिसतंय काहीतरी --

भास्कर : कुरबुरी कसल्या ?

स्मिता : एकदा मनं कलुषित झाली की कुठलीही निमित्तं पुरतात ! --

हेमंत : कारणं बरीचशी कॉमनच असतात, नवी कारणं शोधून काढणारे फार थोडे ! कॉमन म्हणजे उदाहरणार्थ पझेसिव्हनेस !

भास्कर : लग्न न करता एकत्र राहण्याइतके पुरोगामी असूनही ! च्यायला, यातनं सुटणार कधी माणूस हेच कळत नाही !

स्मिता : मूलही होऊ दिलंय दोघांच्याही विचारानं ! पण मला तर वाटतंय की हे सगळं हळूहळू सेपरेशनच्या दिशेनं चाललंय !

भास्कर : ते बरं ! कलुषित मनांनी एकत्र राहूच नये ! मी तर हे अनुभवानंही म्हणू शकतो !

हेमंत : अनुभवाचं ठीक आहे !

भास्कर : म्हणजे ?

हेमंत : म्हणजे अनुभव योग्य वयात आले पाहिजेत -- त्यांचं कशात तरी पर्यवसान झालं पाहिजे ! तसं न झालेले लोक आकलनात कमी असतात असं काही नाही ! उदाहरणार्थ --

स्मिता : आणि पर्यवसान होण्यातच परिपक्कता असते असंही काही नाही !

भास्कर : पण लग्न न करता एकत्र राहणारे नक्कीच धाडसी आणि पुरोगामी असतात ! सगळ्या शक्यता लक्षात घेऊनच त्यांनी आपल्या निर्णयांना मार्ग मोकळे ठेवलेले असतात !

स्मिता : हे तर आपण तिघंही नाकारणार नाही --

हेमंत : हे मान्य !

स्मिता : भास्करच्या प्रश्नाचंही आपण आजच बघू ! रोहिणी येऊन जाऊ दे !

भास्कर : ते ठीक आहे !

हेमंत : निचरा होऊ दे ! ( दारावरची बेल वाजते. स्मिता जाऊन दार उघडते. रोहिणी येते. )

रोहिणी : ( आत येऊन -- ) माफ करा हं, मी डिस्टर्ब करतेय तुम्हाला --

स्मिता : अगं बस, इथं कुणी परकं नाही -- हा भास्कर, आमचा जुना मित्र -- कोणताही संकोच बाळगू नकोस -- आणि याचाही उपयोग होऊ शकेल -- मुख्य म्हणजे हा आमच्यासारखंच इंटरेस्ट घेईल -- आधी तुला पाणी देते, कॉफी करते, मग बोलू --

रोहिणी : त्याची काही आवश्यकता नाही सध्या -- तुमच्याकडे मी कधीच संकोचत नाही --

स्मिता : ठीक आहे, बोल -- तुझ्या प्रश्नाची थोडक्यात कल्पना इथं सगळ्यांना आहे -- या भास्करलाही --

रोहिणी : एकमेकांवरच्या विश्वासानं आणि त्याचबरोबर एका व्यावहारिक खरेपणानं आम्ही लग्न न करता एकत्र राह्यचा निर्णय घेतला -- वर्षदीडवर्ष ठीक गेलं -- नंतर थोडेफार स्वभाव उघड होत गेले -- पण तेही ॲडजस्ट होण्यासारखं होतं -- नंतर दोघांच्याही संमतीनं मूल होऊ दिलं -- आता एक वर्षाचा मुलगा आहे -- दरम्यानच्या काळात क्लॅशेस वाढत गेले -- विशेष म्हणजे, मुख्य कारणं अशी होती की मी कुणाबरोबर किती मिसळावं, चर्चा कराव्या, किंवा गप्पाही माराव्या याच्यावर त्याला त्याचा कंट्रोल असायला हवा होता -- ( हेमंत स्मिताकडे अर्थपूर्ण पाहतो. )

भास्कर : हे म्हणजे डाव्या हातानं पुढं जायचं आणि लगेच उजवा टर्न मारून मागे यायचं असं झालं !

हेमंत : पुढे जाण्यातले फायदे आणि मागे राहण्यातले स्वार्थ दोन्ही मिळाले तर बरंच !

स्मिता : थोडक्यात म्हणजे पारंपरिक नवरे जसे संशयी असतात तसा तो व्हायला लागला --

रोहिणी : हो -- हा मग खुळचटपणाच होता नं --

स्मिता : प्रश्नच नाही -- मग एवढ्या सगळ्यांचा विरोध पत्करून असं एकत्र राहण्याला अर्थ काय राहिला ?!

हेमंत : अर्थात, अशा प्रकारांत, कायद्याच्या अडथळ्याशिवाय वाटेल तेव्हा विभक्त व्हायची सोय असते !

रोहिणी : त्याच लेव्हलला आलंय सगळं ! त्याचं काही दु:ख नाही -- मीही विभक्त व्हायला तयारच आहे -- आर्थिकदृष्ट्याही मी त्याच्यावर अवलंबून नाही --

भास्कर : मग ?

रोहिणी : म्हटलं, मुलगा दोघांच्याही संमतीनं झालेला आहे, तर त्याच्या जबाबदारीचं काय करायचं ?

स्मिता : हं – मग ? --

रोहिणी : याच्यावर त्याचं उत्तर काय तर -- स्त्रीचं एक बरं असतं, अमुक एक मुलगा आपलाच आहे हे ती खात्रीनं सांगू शकते --

स्मिता : मग लक्षावधी कुटुंबं जी चालतात ती कशावर ? या एकतर्फी खात्रीवर की दुतर्फी विश्वासावर ?

रोहिणी : तो म्हणतो, एरवी बरोबर आहे पण एकदा संशय निर्माण झाल्यावर विश्वासाचा काय उपयोग ?

हेमंत : भावनिक होण्यात अर्थ नाही -- समजा त्याचा संशय बेसलेस आहे -- तो नुसता त्याच्या कल्पनेचा खेळ आहे -- तरीही, त्याची सत्यासत्यता सिध्द होत नाही तोपर्यंत त्याच्या प्रश्नात तथ्य आहेच ना !

रोहिणी : तूच घे म्हणतोय त्याची जबाबदारी -- उगीच भांडण वाढवण्यात काही पॉईंट नाही म्हणतोय !

भास्कर : आणि तुझं काय म्हणणं आहे?

रोहिणी : मी म्हटलं, मी सांभाळते त्याला पण त्याची -- पुढे आयुष्यभर -- निम्मी आर्थिक जबाबदारी तू घे --

हेमंत : आणि त्याच्या संपत्तीत वाटा ?

रोहिणी : त्याबद्दल मी काहीही म्हटलेलं नाही, पण, खरं तर तेही त्यानं स्वत:हून म्हणायला पाहिजे --

भास्कर : प्रॉब्लेम आहे खरा --

रोहिणी : नाहीतर, तो म्हणतोय, डीएनए चाचण्या करू आणि सत्यच पाहू -- तो त्याचाच आहे हे सिध्द झालं तर मग सगळंच मान्य करीन म्हणतोय तो -- वाटलं तर सांभाळायलाही तयार आहे मग त्याला तो --

हेमंत : ही काय भानगड ?

रोहिणी : आपल्याकडं कायद्यानंही आता या गोष्टीला मान्यता दिलेली आहे असं त्याचं म्हणणं -- डीएनए चाचणीच्या पुराव्यावरून एका मुलीला कोर्टानं तिच्या वडिलांचं अमुक एक नाव लावायला परवानगी दिली असं त्याचं म्हणणं !

भास्कर : ते खरंच आहे !

हेमंत : अच्छा !

स्मिता : मग, तुझं काय म्हणणं ?

रोहिणी : मला हे अपमानास्पद वाटतं -- ( रडायला लागते. ) विश्वासघात वाटतो हा मला --

स्मिता : रडू नकोस -- काहीतरी सापडेल मार्ग --

भास्कर : म्हणजे दोघंही एकमेकांवर विश्वासघाताचा आरोप करू इच्छितात !

हेमंत : अशा मुलांची काळजी रीतसर शासनानं घ्यायची इकडे पध्दत नाही ! असला विचारसुध्दा सहन होणार नाही इतकी अवघड अवस्था इथे आहे !

भास्कर : जेव्हा वाद निर्माण होतो तेव्हा शेवटी उपलब्ध कायद्याप्रमाणेच तुम्ही दाद मागू शकता -- ! -- नाही तर -- अन्याय वाटला तरी मग तो नुसता सहन करायचा !

हेमंत : भास्कर, डीएनए तपासणीबद्दल तुझं काय म्हणणं ?

भास्कर : मी रोहिणीच्या बाजूचाच आहे, पण माझं म्हणणं असं की नाही तरी आपण एक पुरोगामी मार्ग स्वीकारलाच आहे ना, मग त्याच पध्दतीनं रीतसर सिध्दच करून तोडगा का काढू नये ? ही व्यक्तिगत अपमानाची भानगड यात आणू नये असं मला वाटतं !

स्मिता : मला एक सांग, त्याला तुझ्या बाबतीत खरंच संशय आहे की मुलाची जबाबदारी टाळण्यासाठी तो हा संशयाचा पॉईंट वापरतोय?

रोहिणी : त्याचा संशय खरा आहे -- त्याचा त्याला मनस्ताप होत असलेला दिसतो --

हेमंत : मग आता मला सांग -- संशयाबाबतचा मुद्दा विश्वासानं मिटवावा असं म्हणता येईल का ? नाही ! मग तुझं काय म्हणणं या प्रकारात ?

रोहिणी : हे सगळे त्याच्या डोक्याचे खेळ आहेत -- त्याचा त्यानं आपला गोंधळ निस्तरावा -- प्रत्यक्षात विभक्त होईपर्यंत आपण विश्वासानंच एकत्र होतो हे मान्य करावं !

हेमंत : आणि अचानक संशयाचा झटका येऊन तुम्ही विभक्त झालात – असं ?!

स्मिता : मला तर एक वेगळाच मार्ग सुचतोय -- त्याचा संशय खरा आहे यावर आधारित !

हेमंत : काय?

स्मिता : नको म्हणायचं डीएनए चाचणी ! तुझंच म्हणणं खरं ठरू शकेल म्हणायचं ! बसू दे त्याला या अपमानानं तडफडत !

भास्कर : म्हणजे फिटंफाट ! दोघांनीही एकमेकांना सारखंच तडफडायला लावल्याचं समाधान ! समान न्याय !

हेमंत : हा काही पुरोगामी मार्ग नव्हे पण ! त्यापेक्षा या प्रतारणेच्या मुद्याचा निचराच होणं चांगलं नाही का !?

स्मिता : आपण रोहिणीच्या बाजूनं करणार आहोत विचार !

हेमंत : ते आहे म्हणा !

स्मिता : आणि इतकंही करून तो मुलगा त्याचा आहे असं सिध्द जरी झालं तरी यांचं विभक्त होण्याचं कारण

’ प्रतारणेचा संशय ’ हेच राहणार आहे !

रोहिणी : हो, तसंच आहे ते !

स्मिता : त्याला मग एक कर -- त्याला म्हणावं, जसजसं माझ्या लक्षात यायला लागलं की वरवरचा तुझा वैचारिक मुखवटा जरी खूप उदार असला तरी आतून तू मुळात एक पारंपरिक, मालकी हक्क मानणारा ’ पुरुष ’च आहेस, तसतसं मी ठरवूनच टाकलं की तुझ्याशी प्रतारणा करायला काहीच हरकत नाही ! सांग त्याला असं ! गुंताड्याचं करून टाक सगळं !

रोहिणी : माझा काय फायदा यात?

स्मिता : आपल्याला न्याय मिळणार नाहीच आहे तर मग अन्याय करणाऱ्यालाही भोगू दे त्याच्या वागण्याची फळं !

हेमंत : म्हणजे चांगलं वागलात तर ठीक, नाही तर आम्ही विध्वंस करू ! एक प्रकारचा दहशतवादच करायचा !

स्मिता : सगळ्यांनी समजुतदार राहावं मग ! ( क्षणभराने -- ) आणि -- आम्ही सांगतो असं वागा नाहीतर आम्ही प्रतारणेचा संशय घेऊ -- हा दहशतवाद नाही वाटतं ?

हेमंत : मला या सगळ्याचा राग यायच्या ऐवजी एक असा रिलीफच वाटत चाललाय ! वैचारिक उदारमतवाद आणि भावनिक दहशतवाद हे चित्र पाहून ! कदाचित आपलं सगळ्यांचंच ! म्हणजे जे दुसऱ्यांच्या भावनिक दहशतवादाला घाबरत असतील त्यांनी कायमच वैचारिक उदारमतवादी राहावं -- असं ! असं चित्र !

भास्कर : खरं तर उदारमतवादानं आणि पुरोगामी विचारानंच सगळे प्रश्न सोडवता आले पाहिजेत !

हेमंत : तसं तर क्रांती झाल्यावरही होत नाही !

स्मिता : रोहिणी, तुझं तू सांभाळू शकशील ना त्याला ? स्वत:च्या हिंमतीवर ?

रोहिणी : हो --

स्मिता : मग जाऊं दे ! मी म्हणते तोच उपाय ! त्यालाही करू दे सहन -- अपमान !

रोहिणी : उलटंही होऊ शकेल -- केलंस ना कबूल शेवटी -- म्हणजे माझं बरोबर होतं ! -- असं म्हणून, तो ’ जिंकला ’ असंही समजेल तो !

स्मिता : तरीही त्याला मनस्ताप होईलच ! आणि आपण एकदा मान तुकवायची नाही आणि स्वाभिमान टिकवायचा असं ठरवलं की त्याचा विचारच सोडून द्यायचा ! त्याला काय वाटेल ते त्याच्याबरोबर ! आपल्याला काय करायचंय !

रोहिणी : हं --

हेमंत : रोहिणी, समज वेगवेगळ्या प्रकारे, तुला आणि मला काही ठरवायचं आहे ! -- मी समजुतदार राह्यला तयार आहे, तू दहशतवादी हो ! ॲग्रीड ! चलो ! ( उठतो. )

स्मिता : थांब, जातोस कुठं --

हेमंत : निचरा झाला ना आता --

भास्कर : सॉरी ! एक ! आपली मघाची चर्चा आणि हे -- असं एकत्र काही नाहीय हं ! ते वेगळं, हे वेगळं !

हेमंत : एकच समजूत दोन्हीकडे कशी चालेल ?। समजूतसुध्दा परिस्थितीनुरूप बदलायला नको ? !

स्मिता : तू नं हेमंत, खरं म्हणून बोलतोयस की उपरोधिक बोलतोयस ते आधी सांगत जा जरा -- कधीकधी हे दोन्ही सारखंच वाटतं तुझं !

हेमंत : आत्ता मी खरं म्हणूनच बोलतोय -- पण त्याला आपोआप उपरोधिक टिंज येते कधीकधी हे मलाही मान्य आहे -- विशेषत: बोलता बोलताच जेव्हा माझ्याच समजुतीबद्दल मला शंका येते तेव्हा असं होत असावं --

रोहिणी : इथं आल्यामुळं माझी एकूण प्रक्षुब्धताच कमी होतेय -- एखाद्या गोष्टीला अनेक बाजू आणि अनेक शक्यता असणं हेच आता मला निरर्थक वाटायला लागलंय --

स्मिता : अगं, पण तुला तर ठरवावं लागणार आहे -- नेमकं काय करायचं ते --

रोहिणी : मला वाटतं आता त्याची फार काळजी करायचं कारण नाही -- निरनिराळे डाव खेळायला जागा मोकळी ठेवून मला आता वागता येईल -- आपल्या प्रक्षुब्धतेमुळं वागण्याला मर्यादा पडतात --

स्मिता : आणि नाहीतरी तू अमूक कर असं तुला सांगणं हा या विचारविनिमयाचा उद्देशच नाही -- शेवटी प्रत्यक्ष वागणं हे तुझंच काम आहे --

भास्कर : मला वाटलं होतं प्रक्षुब्धतेमुळं वागण्याला एक असा फोर्स येत असेल !

हेमंत : दोन्ही बरोबरच असतं -- योग्य वेळी योग्य तसं किंवा योग्य मिश्रण करून वागता आलं पाहिजे --

स्मिता : पण साधं, सरळ असावं ते -- आपलाच गोंधळ होऊ नये --

हेमंत : कळलं ना रोहिणी ?

रोहिणी: उगीच मी इकडं येत नाही -- आपला गोंधळ कमी होणं हाच मार्ग -- मला वाटतं --

स्मिता : आभारासारखं वगैरे काही बोलू नकोस -- वुई आर नॉट ऑथॉरिटीज ऑन एनीथिंग --

रोहिणी : नाही, तसं नाही -- चलू मग मी ? काल केवढं केलंत तुम्ही माझ्यासाठी ! -- आणि आज हे पुन्हा !

स्मिता : काही चहा, कॉफी -- काहीही नकोय ? नाही तर जेवायला थांब आमच्याबरोबर --

रोहिणी : नको, पुन्हा येईन मी -- अच्छा -- ( भास्करला -- ) बरंय काका --

भास्कर : हो -- बरंय -- ( रोहिणी जाते. हेमंत उभाच आहे, तो दार लावून येतो. )

स्मिता : मला तर वाटलं की आपलं सगळं बोलणं तिला जास्तच कन्फ्यूज करणारं होतं --

हेमंत : आणि तिला वाटलं समज वाढली --

भास्कर : एकूण चर्चेतून तिची तिला आली असेल क्लॅरिटी -- आपलं कर्तृत्व काही नाही त्यात -- ती ब्रिलियंट आहे -- शिवाय देखणी ! इतक्या देखण्या मुलीला दु:ख असणं ही एक विकृतीच वाटते मला निसर्गातली --

हेमंत : म्हणजे देखणे नसलेले दु:खी होणं ठीक आहे --

स्मिता : आणि निसर्गाची शक्ती -- जगन्नियंता -- असले नकोत काही विषय -- जे आहे ते आहे --

हेमंत : माझं तेच म्हणणं -- जे माहीत आहे तेवढ्यातूनच येईल तेवढी येईल समज !

स्मिता : पुन्हा उपरोधिक ! --

हेमंत : उपरोधिकपणाबद्दलचं माझं स्पष्टीकरण मी आधीच दिलेलं आहे -- मीच कन्फ्यूजड् असणं ! आणि मघाशी भास्कर जे म्हणाला की ते वेगळं आणि हे वेगळं -- तर माझ्या विचारानं मला असं दिसलं की दोन्ही बाबतीत संगतवार राहता आलं पाहिजे असा मी प्रयत्नही केला नव्हता !

भास्कर : आपलं सगळ्यांचंच असंच असणार ! म्हणून तर मी तसं म्हणालो होतो !

स्मिता : वैचारिक रचना डोक्यात इतकी पक्की करून टाकायची की तिच्यातून आपोआप संगतवार प्रतिक्रिया दिल्या जाव्यात -- असं होणं म्हणजे मृत्यूच होईल तो !

हेमंत : आणि मान्य असलेल्या विचारसरणीशी फारसा संबंध नसलेल्या प्रतिक्रिया दिल्या जाणं हे जगणं !

भास्कर : हेही पटत नाहीय ! विचारसरणीच्या पार्श्वभूमीतून जिवंत प्रतिक्रिया देणं असं खरं तर असलं पाहिजे !

हेमंत : म्हणजेच कन्फ्यूजड् आणि उपरोधिक असणं ! ते असो, पण आज माझ्या लक्षात येतंय की हे डीएनए तपासणी प्रकरण फारच सनसनाटी होणार आहे ! सगळ्या सांस्कृतिक विश्वाला तडे जातील अशानं ! आणि मुख्य म्हणजे बायकांना जर वाटत असेल की पुरुषांना -- विशेषत: नवऱ्यांना -- आपण कसेही वेडे बनवू शकतो, तर -- हे वाटणं तर धुळीलाच मिळेल आता !

भास्कर : त्यामुळं, खरं वागण्याचं आणि पर्यायानं डाव्या विचारसरणीचं महत्त्व वाढेल !

हेमंत : ( स्मिताला -- ) मला आता हे -- याचं बोलणं -- उपरोधिक वाटतंय !

स्मिता : आपल्या नकळत उपरोधिक होणं वेगळं आणि जाणूनबुजून उपरोधिक होणं वेगळं ! आपल्या वागण्यात सारखी संगती शोधणं घातक होईल ! आता तिच्याशी बोलताना मी म्हणाले की त्यालाही सहन करू दे कारण तो सरळसरळ तिच्यावर अन्याय करतोय असं मला वाटतं ! हेमंतबद्दल माझा असा ॲप्रोच कधीच असणार नाही !

हेमंत : सगळीकडची आपली बाजू सांभाळत तिच्याशी बोलणं असं अपेक्षितच नव्हतं ! आपलीही काही विसंगती सापडू शकेल ! आणि नुसती आपली बाजू म्हणजेसुध्दा पूर्ण क्लॅरिटी असते असं मला वाटत नाही ! तसं असतं तर मग चिंता, काळजी, भीती या गोष्टींचं उच्चाटनच झालं असतं !

भास्कर : बरं, ते ठीक आहे, झालं ते सगळं ! आता आपलं बोलू ! आपल्या प्रश्नाबद्दल ! -- म्हणजे माझ्या --

स्मिता : मला वाटतं, आता बाकीची काही गरज नाही, एवढं बास !

भास्कर : म्हणजे ? बोललो मी ! कशासाठी ?

हेमंत : तसं नाही -- तुला काय म्हणायचंय ?

भास्कर : स्मिताशी बोललोय मी -- माझा घटस्फोट झालेला आहे -- बायको आणि मुलं यांचे आणि माझे आता संबंधही नाहीत -- इट इज ऑल ओव्हर -- तर माझी सुमारे सत्तर लाखांची मालमत्ता मला विनयच्या नावे करायची आहे -- जर खरंच तो माझा असेल तर --

हेमंत : तुझा नसेल तर ?

भास्कर : असण्याचीच शक्यता जास्त आहे !

हेमंत : बरं मग ?

भास्कर : तर डीएनए टेस्ट करून निश्चित करावं असं वाटतंय !

हेमंत : अरे वा ! हे डीएनए प्रकरण फारच लोकप्रिय व्हायला लागलंय म्हणजे !

भास्कर : मी आधीच बोललो होतो हा विषय स्मिताशी !

हेमंत : ओके ! म्हणजे रोहिणीच्या बोलण्यातून तुला ही पुरोगामी आयडिया मिळाली असं नाही !

भास्कर : दुसरा उपायच नाही ना !

हेमंत : म्हणजे निश्चित असेल तरच तुला हे करायचंय !

भास्कर : आपले विचार काहीही असले तरी जगतोय आपण इथल्या परिस्थितीत ! हे, म्हणजे विनयबद्दलचं सत्य, विनयला कळायची मला गरज वाटत नाही, फक्त मला कळलं की बास !

हेमंत : फक्त तुझ्या मनात ही खात्रीशीर फॅक्ट तयार व्हायला हवीय ! आपल्या तिघांखेरीज कुणाला कळणारही नाहीय !

भास्कर : करेक्ट !

हेमंत : कशाला हा मानसिक भिकारडेपणा ? त्याच्या नावे कर आणि मोकळा हो ! आणि आमचाही विचार कर ना ! गूढच राहू दे ते !

भास्कर : तसं नसेल तर -- खोटं कशाला बोलू -- पक्षकार्याला द्यायच्या विचारात आहे -- पण तसं असेल तर त्याचा न्याय्य फायदा व्हावा असं वाटतं -- तू अडवू नकोस --

हेमंत : आता इथून पुढे जे बोलणं होईल ते -- ते कसं असेल ? आपापले अहंकार रेटणारं ! आम्ही काय म्हणून तुझ्या या मागणीला तयार व्हावं ?

भास्कर : तुमच्या दोघांत क्लॅरिटी होणारच आहे -- आणखी कुणाला हे कळणारही नाहीय -- तुमच्याच मुलाचा फायदा होणार आहे --

हेमंत : च्यायला, आपण चर्चा काय केल्या आणि बोलतोयस काय तू हे !

स्मिता : मलाही वाटतं, ठीक आहे, त्याची मागणी मान्य करावी ! त्यामुळं कुठंच, काहीच फरक पडणार नाहीय ! विनयलाही कळू नये याची काळजी फक्त घ्यायची !

हेमंत : मुळात कुणाला काही कमी नाहीय ! विनयलाही !

भास्कर : बाकीचं जाऊं दे ! माझे गुण, दोष, विचार, कमकुवतपणा वगैरे वगैरे सगळं लक्षात घेऊन माझ्या प्रश्नावर काय करायचं तेवढंच बघा !

हेमंत : का ? माझा प्रश्न नाही ? स्मिताचा नाही ?

भास्कर : कदाचित मी जास्त कमकुवत घटक आहे !

स्मिता : आणि मीही ! मला अंदाजे -- एखाद्या कृतीची माफी नकोय -- त्या कृतीच्या परिणामासह माफी हवीय !

हेमंत : माफी म्हटलं की आपण त्याच पारंपरिक वैचारिकतेत अडकतो !

स्मिता : मलाही गूढ -- शिल्लक राह्यला नकोय काही !

हेमंत : ओके ! पण माझा आणखी एक मुद्दा आहे !

भास्कर : बोल ना !

हेमंत : मी कमावलेली, माझी स्वतःची सुमारे दोन कोटींची किंवा जरा जास्तच मालमत्ता आहे ! दोन्ही मुलांना निम्मीनिम्मी द्यायचा माझा विचार आहे ! मुलांना त्याची गरज नसली तरीही ! ही सगळी मालमत्ता पक्षकार्याला द्यायचा माझाही विचार नाही !

भास्कर : ठीक आहे ना ! विनयला माझे सत्तर लाख जास्त मिळतील ! काय फरक पडतोय !

हेमंत : पण तू जी म्हणतोयस ती क्लॅरिटी समजा झाली -- तो तुझाच आहे, असं ठरलं -- तरीही मी निम्मेनिम्मे हेच तत्त्व धरून राहू ? कशाला ? मी मग माझी सगळी मालमत्ता विश्वासला देईन -- विनयला मिळू देत तुझे सत्तर लाख ! आणि माझ्याकडून त्याला मिळणारा वाटा जास्त असणार आहे हे लक्षात घे !

भास्कर : त्यांना गरज नाहीच आहे, हा आपण पाया धरू आणि मालमत्तेतला कमीजास्तपणा विसरून जाऊ !

हेमंत : थोडक्यात म्हणजे सगळं तुला फेव्हरेबल, तुझ्या म्हणण्याप्रमाणे करत जाऊ !

भास्कर : आपण जे विचार बाळगले ते बाळगण्यात आपण प्रामाणिक होतो आणि आपण त्याहून वेगळं वागलो याचा अर्थ तो विचारांतला प्रामाणिकपणा खोटा होता असं नाही -- हे सत्य अबाधित राहण्याची गरज आपल्याला सगळ्यांनाच आहे !

हेमंत : समाजपरिस्थितीप्रमाणे मन घडून मन आणि शरीर परस्पर वागत राहिले असते तर हे प्रश्न आले नसते ! कदाचित तसंच घडतही असेल पण आपल्याला निवडीचं स्वातंत्र्य आहे असंही आपण मानतो !

भास्कर : आता सगळ्यांच्या पोझिशन्स समोर आलेल्या आहेत ! याला नियंत्रित करणारी कोणतीही बाह्य शक्ती नाही ! फक्त आपण तिघं ! आणि तेच फायनल !

स्मिता : भौतिक सत्य महत्त्वाचं ! त्याला टाळायचं नाही ! ते कळूनही काय ते घडावं ! मृत्यू फार लांब नाही !

हेमंत : म्हणजे विनयचं नुकसान होणार ! कारण, विनयबाबतच्या प्रेमानं हे सगळं चाललं असेल तर त्याच्याबद्दलचं सत्य आपल्या तिघांसमोर का असेना उघड होण्यात त्याचा फायदा आहे की उघड न होण्यात -- हा प्रश्न विचारात घ्यायला नको ? तुम्ही एक चुकलात ! हे सत्य तुम्हा दोघांपुरतंच राह्यला पाहिजे होतं ! मला यात सामील न करता तुम्ही जमवायला हवं होतं !

भास्कर : नाहीतरी सगळं नष्टच होणार आहे तर मग दुर्लक्षच कर ना तू या गोष्टींकडे ! शरीर खलास -- सगळं खलास ! अं ?!

स्मिता : अशा -- हेमंतला सामील न करण्याला मी तयार नसते झाले !

भास्कर : मला आता एकच चांगला पर्याय दिसतो. सत्य शोधून काढायचं. ते जर माझ्या अपेक्षेप्रमाणे असेल तर विनयला माझी प्रॉपर्टी आणि थोरल्याला -- विश्वासला -- तुझी प्रॉपर्टी -- असं करू ! योग्यही होईल ते ! आपल्या दोघांच्याही दृष्टीनं ! कमीजास्तचा त्यांना काही फरक पडत नाही !

हेमंत : आणि मी असं का वागलो -- त्याला का वगळलं -- याबद्दल विनयनं काय समजावं ?

स्मिता : जाऊं द्या मग -- हा विषयच नको आता -- भास्कर, तू तुझी प्रॉपर्टी पक्षाला देऊन टाक -- आमचं इकडे काही डिस्टर्ब करण्यात काही अर्थ नाही --

हेमंत : आपल्याला एकच विचारसरणी जरी पटत असली ना तरी आपली मनं घडवणारी परिस्थिती आणि शरीरं वेगवेगळीच असणार आहेत ! यातून एकाच समजुतीवर आपण पोचणं शक्य नाही ! म्हणूनच ही विचारसरणी अंमलात आली तरी संघर्ष थांबले असं होणारच नाही ! आणि इथं तर या विचारसरणीची परिस्थितीही नाही ! समाजाच्या एकूण धारणा, कायदे वेगळेच आहेत !

स्मिता : मला वाटतं -- हेमंत मानून चालायला तयार आहे ना की विनय त्याचा आहे -- तसंच भास्करनंही विनय त्याचा आहे असं मानून चालावं ! प्रश्नच नको ! हे सगळं बोलणं आपण विसरून जाऊ !

हेमंत : भास्कर, ऍब्सर्ड थिएटरमधले इकडचे तिकडचे सामाजिक तुकडे काढून आपण बोलत बसलो -- कारण ते जगन्मान्य थिएटर नाकारणं शक्यच नव्हतं -- पण आपल्याला ॲब्सर्डिटी कळली नाही हेच खरं ! आता ती कळायची संधी वाटतेय मला ही ! विचार -- या साधनाचाच पराभव !

भास्कर : आयनेस्को म्हणत होता -- जगात दोनच प्रकारची माणसं असतात -- एक म्हणजे अध्यात्मिक स्तरावर असमाधानी -- आणि दुसरी म्हणजे उरलेली -- गधडी ! -- हे आपल्याला पटणारं नव्हतं !

हेमंत : मी आता तुला या सगळ्यातून निघणारा एक म्हटलं तर सर्वोत्तम पर्याय सांगतो. स्मिता म्हणते तेच ! तुम्ही दोघं इतकं म्हणत असूनही मी विनयला माझाच मानून चालायला तयार आहे. तुम्हाला दोघांना तर जवळजवळ खात्रीच असल्यानं तूही तो तुझाच आहे असं धरून चाल. दोघांनाही समसमान न्याय आणि काहीही डिस्टर्ब करायचा प्रश्नच नाही ! विनयचा फायदा होईल तो होऊ दे ! ( क्षणभराने -- ) आणि याच्याहून भारी म्हणजे -- ( क्षणभराने -- ) तो तुझा नाहीच असंच धरून चाल ना तू ! –

( शांतता. )

भास्कर : आपण डावे असल्यामुळं या विषयावर बोलायची तरी हिंमत आहे आपल्यात ! पण एक लक्षात येतंय -- वैचारिक पध्दतीनं फाटे खूप फुटतात आणि सगळ्यांची एक समजूत असं छान, स्मूथ काही होऊ शकत नाही !

हेमंत : ॲब्सर्डिटी रे !

भास्कर : थोडक्यात म्हणजे सत्य शोधायची गरज नाही !

हेमंत : करेक्ट !

स्मिता : ( उठत -- ) सापडला शेवटी निर्णय ! आणि चांगला सापडला ! चला, आत या ! पानं मांडतेय !
( हळूहळू आत जाते.)

हेमंत : ( ती गेल्यावर -- ) एकूण आपल्या वागण्याचा विचार करता, तुला आणखी एक पर्याय सांगतो -- दिल्लीला जाऊन लाल किल्ल्यावर उभा राहा -- आणि तिथून उधळत राहा नोटा -- अशा -- ( ॲक्शन करतो. ) चल -- ( तो आत जातो. )

भास्कर : आत्तापर्यंत मी शहाणपणानं जगलोय -- आता मरता मरता वेडा कशाला होऊ ? -- बघू -- ( क्षणभर विचारात उभा. एवढ्यात फोनची रिंग वाजते. आत पाहात -- ) सावकाश ये ! -- मी बघतोय -- ( हळूहळू जाऊन फोन घेतो. ) हॅलो -- हं -- बोल रोहिणी -- मी भास्करकाका -- ( इथे हेमंत बाहेर आलेला -- त्याला -- ) बोलतोयस ? रोहिणी आहे -- ( हेमंत त्यालाच बोलायची खूण करतो. ) हं, बोल -- नाही, नाही, खरंच -- नो डिस्टर्बन्स -- भेटलोय बऱ्याच दिवसांनी, बसलोय आपलं गप्पा मारत -- संकोच नको करूस -- बोल -- पुन्हा येतेयस का इकडे -- ये ना ! -- अगं, जसा हेमंत तसा मी -- ये तू -- काही गंभीर नाही ना ? -- बरं, आल्यावर सांग -- ओके -- अच्छा ! -- ( बाहेर -- ) पुन्हा येतेय ती -- सीरीयस काही नाही म्हणाली --

हेमंत : ठीक आहे, चल, आपली पानं वाढलीयत --

भास्कर : हं -- आलोच -- ( आधी हेमंत आत जातो, नंतर भास्कर जातो. अंधार. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा भास्कर समोर बसलेला. हेमंत सुपारी आणतो. चमच्याने भास्करला देतो. मग स्वत: थोडी तोंडात टाकतो आणि डबा ठेवून देतो. बसतो. काही क्षण कुणी काही बोलत नाही. )

हेमंत : इतकी गंभीर, वैचारिक बोलणी झाल्यानंतर जेवताना मात्र, हे छान आहे, ते छान झालंय आणि कुठंतरी उत्तम चिकन खाल्ल्याची आठवण -- यापलीकडं तू काही बोलला नाहीस ! बराच वेळ वैचारिक काहीच झालं नाही !

भास्कर : कसलं वैचारिक ! सगळीकडनं मार खात आलेला माणूस मी ! आणि कुणी का असेना, माणसाच्या आयुष्यात साधा, बिनवैचारिक भाग असणारच ना बऱ्यापैकी ! आणि आपल्या मनासारखं काही होत नाहीय, तरीही नॉर्मल वागता येतंय -- असं, मन असलेल्या, कुठल्या माणसाचं होऊ शकेल ?

हेमंत : ये हुई ना बात ! पण खूप विचारानं शहाणपण कमावलेले लोक आणि इतर लोक यांच्या जगण्यातल्या साध्या, तू म्हणतोस तशा, बिनवैचारिक भागात काय फरक असेल ?

भास्कर : मला नाही वाटत ! मन ही एक व्यक्तिगत, खाजगी बाब आहे, आपण विचार करतो ते समाजाबद्दल, सामाजिक प्रश्नांबद्दल --

हेमंत : मननिरपेक्ष ! ( शांतता. नंतर -- ) तरी मी योनिशुचितेचा प्रश्न घेतलेला नाही डोक्यात -- नाही तर पुरोगामीपणे वागून दुर्लक्ष करावं की इथल्या कल्चरप्रमाणे वागावं -- असा निरुत्तर करणारा एक प्रश्न येईल समोर !

स्मिता : ( बाहेर येत -- ) म्हणजे तो डीएनएचा विषय सोडूनच दिला का आपण आता ?

हेमंत : तुझ्याशी संबंधित नसलेल्या विषयासारखं निदान इथं तरी ॲकॅडेमिक होऊ नकोस ! आणि खूप विचार करून एका शेवटाला पोचलोय ना आपण मघाशी ?!

भास्कर : ( उसळून -- ) कसला शेवट ? वेडंवाकडं भरकटत कुठंतरी पोचलो आणि तू त्याला शेवट म्हणायचं ठरवलंस ! तुझ्या मर्जीनं !

हेमंत : मला वाटतं, त्यातल्या विचार करायच्या शक्यता आता संपलेल्या आहेत !

भास्कर : तोही काही ऍकॅडेमिक विषय नव्हता ! तिघांनाही पटेल असं काही सापडायला हवं होतं ! आणि मीच विषय काढलेला असून मला काहीच दिशा मिळाली नाही ! मग माझ्या, इतकं मोकळेपणानं वागण्याचा काय उपयोग झाला ?

हेमंत : मैत्री म्हणजे एकमेकांवर टाकायचं दडपण नव्हे भास्कर ! ( इथे बेल वाजते. हेमंत जाऊन दार उघडतो. रोहिणी आत येते. )

रोहिणी : आता मेंदूला व्यायाम द्यायला नाही, चांगलं सांगायला आलेय मी !

भास्कर : बघा, म्हणजे असा प्रॉब्लेम असूनही काही चांगलं निघू शकतं !

स्मिता : बस अगं ! एवढ्या तातडीनं दिशा मिळाली की काय तुला ?!

रोहिणी : तेच तर ! मलाही आश्चर्यच वाटतंय ! मी इथं येऊन गेले ना, त्यातूनच मला दिशा मिळाली बहुतेक !

स्मिता : एवढा साठत साठत आलेला प्रश्न एका दिवसात सैल पडू शकतो ?! बोल, बोल !

रोहिणी : मी इथून जी गेले ती मनाच्या एका वेगळ्या तयारीनंच गेले. अमुकच व्हायला हवं असा अट्टहासही नाही आणि काहीही झालं तरी तयार ! आणि प्रक्षुब्धता नाही ! त्यामुळं टेन्शनच गेलं होतं किंवा खूपच कमी झालं होतं ! मी बराच वेळ काही बोललेच नाही त्याच्याशी. मी इकडे येऊन जाते त्या अर्थी

तुमचाही सल्ला मला मिळत असणार हा अंदाज असणारच त्याला. आणि तुमचा सल्ला असातसा नसणार एवढं समजतं त्याला ! त्यामुळं, तोही गप्पच होता. मी काही बोलतेय का, त्यातून काही अंदाज येतोय का, हेही त्याला पाह्यचं असेल. आणि मला वाटतं, नुसतं या मानसिक ॲप्रोचनंच काम झालं ! ‘ सॉरी ! ‘ म्हणाला. त्याचं चुकलं म्हणाला. मला मनातनं आश्चर्यच वाटत होतं पण मी ते दाखवलं नाही. त्यानं खूप विचार केल्यावर त्याची चूक त्याच्या लक्षात आली म्हणाला. माझ्याबद्दल असं संशयानं वागणं हा त्याचा मूर्खपणा झाला, इतकं म्हणाला तो ! म्हटलं बरं, मग, आता काय ? तर ‘ माफ कर ‘ म्हणाला ! म्हटलं, मी असला अपमान सहन करणार नाही हे लक्षात येतंय का तुझ्या ? तर ‘ मान्य ‘ म्हणाला. पुन्हा ‘ सॉरी ‘ म्हणाला. ‘ जे काय झालं ते सगळं विसर ‘ म्हणाला. ‘ प्ली ऽऽ ज ‘ म्हणाला. म्हटलं हा साक्षात्कार कसा काय झाला तुला ? तर, त्याचा त्यानं केलेला विचार आणि माझा आत्ताचा चेहरा ही कारणं त्यानं सांगितली. मग आम्ही जेवलो. खूप दिवसांनी टेन्शनफ्री होतो आम्ही. जेवण झाल्यावर, मला, तुम्हाला भेटून हे सांगायची इच्छा अनावर झाली. हे मी त्याला सांगितलं. अवश्य ये जाऊन म्हणाला.

स्मिता : चमत्कारच म्हटलं पाहिजे याला !

रोहिणी : त्या वेळचा चेहरा असं जे तो म्हणाला ना तो इथं मिळालेल्या समजुतीमुळं झालेला होता.

हेमंत : होतं असं कधीकधी ! जुन्या भाषेत म्हणजे मृगजळातनं पाणी मिळणं आणि त्या पाण्याचं अमृत होणं !

भास्कर : म्हणजे आपल्याला अशक्य वाटणारे प्रश्नही सुटू शकतात ! छान ! छानच झालं ! ( इथे फोनची रिंग होते. हेमंत जाऊन फोन घेतो. )

हेमंत : हॅलो -- हं -- हो, आहे -- ( रोहिणीला --) तुझा फोन -- परम -- ( ती जाऊन फोन घेते. तो येऊन बसतो.) हिच्या बाबतीतलं हे आपलं यश साजरं करायला पाहिजे -- ( स्मिताचे रोहिणीकडे लक्ष आहे. ती हेमंतला ‘ थांब ‘ अशी खूण करते. आता सगळेच रोहिणीकडे पाहतात. ती गंभीरपणे ऐकतेय. फोन संपल्यावर ती सावकाशपणे फोन ठेवते आणि येऊन बसते. काही क्षण. मग -- )

रोहिणी : तो म्हणाला की मघाशी त्याची सांगायची हिंमत झाली नाही पण आता फार वेळ माझ्याशी खोटं वागणंही अपराधीपणाचं वाटतंय. म्हणून फोन केलान त्यानं. त्याचं म्हणणं की.....मला न सांगता त्यानं डीएनए टेस्ट करून घेतलेलीच होती. आजच त्याला मॅच होत असल्याचा रिपोर्ट मिळाला. आता त्यानं मला फसवलं असं त्याला वाटतंय. ‘ सॉरी ‘ म्हणतोय तो...माझ्या प्रतारणेचा विषय निकालात काढण्यासाठी त्यानं केलीय ही अशी प्रतारणा ! पण, हेतू चांगलाच होता म्हणतोय तो ! आणि माझ्यावर प्रेम नसतं तर ही त्याची चूक त्याला कबूल करायचीही गरज नव्हती -- कारण हे कुणाला काही कळायची शक्यताच नव्हती असं म्हणतोय तो.

स्मिता : याලाच म्हणतात पुरुषी सत्ता ! ‘ प्रेम ‘ हा शब्द उच्चारला की संपला स्त्रीचा प्रतिकार असं गृहीतच धरलेलं ! म्हणजे संशयच होता त्याला आणि त्या प्रक्षोभात तो हिचं सगळंच वागणं विश्वासघाताचं समजत होता आणि तसं बोलत होता ! हे असलं मन ! त्यानं खूप विचार करणं, हिचा चेहरा, या बंडलाच म्हणजे सगळ्या !

भास्कर : आता ‘ संशय का मनी आला ‘ याचाच प्रेस्टीज पॉईंट करत बसण्यात काही अर्थ नाही. रोगावर औषध घेतो की नाही आपण, तसंच, आधुनिक तंत्रज्ञानाच्या या औषधानं त्यानं रोग घालवला, असं समजायचं ! आणि आपल्या स्वत:च्या मनानं कसं वागलं पाहिजे, हेही आपल्या हातात नाही, तर, दुसऱ्याच्या मनाचं काय ! लीव्ह इट ! प्रश्न सुटला ! बी हॅपी ! बी चिअरफुल !

हेमंत : मलाही वाटतं, फरगेट इट ! ( रोहिणीला -- ) एकोपा झालेलाच आहे, पुन्हा एकदा एकोपा करून टाका -- जा, पळ --

स्मिता : बरं, दे सोडून -- हेच ठीक म्हणू ... जा बाई जा -- आणि ठरलं ना, आता इथे नको वेळ घालवत बसूस -- आणि आता दे सोडून -- मुख्य म्हणजे याच्यावर आता विचार नको करूस ! चिडावंसंही वाटू शकतं पण एका वेळी एकच वागता येतं ! आयुष्याची मर्यादाच म्हणायची ही एक ! --

रोहिणी : त्याचं कसंही झालं असलं तरी माझ्या लेखी तुमचं महत्त्व मुळीच कमी होणार नाही..... जाऊ मी ?

हेमंत : हं, जा, जा -- ( ती आभारदर्शक थांबून निघते, जाते. )

भास्कर : आपल्या तिघांच्या विचारवंतपणाचं एक प्रचंड यश म्हणून या रोहिणी प्रकरणाची इतिहासात नोंद व्हायला पाहिजे !

हेमंत : आता हे उपरोधिक कोण बोलतंय ?

स्मिता : हे जाऊं दे असलं किरकोळ एकमेकांना टोचणं -- त्याहून खूप मोठा विषय आहे आपल्यासमोर --

हेमंत : आता कुठाय कुठला विषय ?!

स्मिता : असं अर्धवट, अधांतरी नको -- शेवट काय निघतोय ते नक्की ठरू दे -- ज्याचे त्यानं काढत बसा अर्थ -- असलं प्रायोगिक नाटक नको !

हेमंत : मी सांगतो. शेवट. मी हे सगळं विसरून जायला तयार आहे. तुम्हाला माहीत आहे, ते तुमच्याजवळच राहू द्या. मधेच कधीतरी विनय नखं काढताना दिसेल तेव्हा मी त्याची एकदोन नखं ( भास्करला -- ) तुझ्याकडे पाठवून देईन. तुझं तू समाधान करून घे. मग तुझी मालमत्ता तू माझ्या नावावर कर. ऐक. मी माझी एकूण मालमत्ता निम्मीनिम्मी माझ्या दोन्ही मुलांना देणारच आहे. त्यात तुझी निम्मी इच्छा पूर्ण होईलच ! आणि जुनं, संस्कृत असलं तरी ‘ अर्धं त्यजति पंडित: ‘ याचं महत्त्व ओळख. आता परत जाताना खट्टू राहू नकोस ! ओके ?! राहिला प्रश्न स्मिताचा --

स्मिता : काही नाही प्रश्न -- हे कुठं काही बोललं जाणारच नाहीय आणि ( हेमंतला -- ) आपण समजुतदार

राहू --

भास्कर : हं..... हे ठीक होईल.....

हेमंत : आता हे मी सांगणं याला शहाणपणाही म्हणता येईल आणि पळपुटेपणाही !

भास्कर : तसं नाही.....

स्मिता : आपण पुरोगामी असल्यामुळं प्रश्नांना तोंड तरी देऊ शकतो --

हेमंत : दुसरी कुणी माणसं असती तर मेली असती यात !

भास्कर : खरं आहे --

हेमंत : रोहिणीचा प्रश्न मिटला, आपलाही मिटला ! विचार ही प्रश्न मिटवणारी एक ग्रेट गोष्ट आहे !

भास्कर : नाही, आहे खरं --

हेमंत : काय -- नाही का आहे ?

भास्कर : आहे आहे --

हेमंत : त्यामुळं, जेवणं झाली असली तरी, निव्वळ सेलेब्रेशन म्हणून एकेक पेग ! ( भास्करला -- ) चालेल ना ?

भास्कर : दोनदोनही चालतील !

हेमंत : स्मिता, प्लीज ! ( ती सस्मित उठते -- ) आलोच मीही मदतीला --

स्मिता : काही नको -- ( ती आत जाते, बाटली आणून बाहेर ठेवते, पुन्हा आत जाते, ग्लासेस आणते, पुन्हा आत जाते -- )

हेमंत : सामाजिक विचारांनी व्यक्तिगत प्रश्न सोडवल्याचा खोटा आनंद ?

भास्कर : नाही. खरा आनंद !

हेमंत : बरं, खरा आनंद ! ( स्मिता इतर सर्व ट्रे आणते. )

स्मिता : आता भास्कर भरेल पेग --

भास्कर : आनंदानं -- ( तो पेग भरत असताना पडदा पडत जातो..... )

**----- ० समाप्त ०-----**

**--- ००० ---**

**सूचना -- सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.**

चं.प्र.देशपांडे,

फोन -- ९३७१००५७७३.

ईमेल – champrade@gmail.com
संकेतस्थळ – www.champralekhan.com